मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

नाटक ८८ स. १८९०

ले. म. चिं. देव

मालती माधव

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

नाटक

गजानन चिंतामण देवकृत.

साग्र संगीत

# मालती माधव नाटक.

हें

कविवर्य भवभूतीच्या प्रसिद्ध मालतीमाधव

नाटकाचे आधारानें रचून

तें

पुणें, येथें 'अंबाप्रसाद' छापखान्यांत छापिलें.

सन १८९०.

आवृत्ती पहिली.

[सदरहू पुस्तका संबंधानें सर्व अधिकार १८६७च्या
२५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर करून ग्रंथ-
कर्त्यानें आपणाकडे ठेवले आहेत.]

किंमत १ रुपाया.

# प्रस्तावना.

साहित्यसंगीतकलाविहीनः ॥
साक्षात्पशुपुच्छविषाणहीनः ॥
तृणंनखादंनपिजीवमान-
स्तत्भागधेयंपरमंपशुनाम् ॥१॥ भर्तृहरी.

आलीकडे लोकानां लागलेली संगीताची अभिरुची पाहून आपण ही कांहीं तरी त्यांची सेवा करावी असें मनांत आल्यावरून कविवर्य भवभूतीचे जगन्मान्य मालती माधव नाटक हे यथामतीनें संगितात रचिले आहे. प्रथम हे निव्वळ भाषांतर केले होते. परंतु त्याचा प्रयोग होणे दुर्घट असे कित्येक नाटककारानी सुचवल्यावरून मुळांतील भागाला जितका धक्का न लागेल तितका लागूं देता अतिशय वर्णन होते ते गाळून हे पांच अंकांत सर्व आणले आहे. तेव्हां यांत दोष ही पुष्कळ असण्यचा संभव आहे परंतु यापेक्षां सुरेख असें दुसरे नाटक होईपर्यंत तरी यापासून लोकांची थोडी सेवा घडली ह्मणजे या ग्रंथकर्त्याचे परिश्रम सफल होतील.

ग्रंथकर्ता.

पुणें, ३१ जानेवारी १८९० इसवी.

## संगीत

# मालती माधव नाटक.

## अंक पहिला.

(पद) चाल. हें वंदन त्या श्रीशुभदायाहीं.

वंदिन आधीं हिमनगजेशा ॥ चिरसुखदायक त्या देवेशा ॥ धृ० ॥ मग गणपतिचें चिंतन करुनी ॥ लाविन मतिही नाटक रचनीं ॥ गुणवंता ती सादर अर्पुनि ॥ सेविन त्यांच्या प्रसाद लेशा ॥ १ ॥

(पद) चाल. अर्धांगीकृत नारि सदाशिव ही.

भुजंगवेष्टित पशुपति तुह्मां रक्षक होवो तो ॥ रुंड कंठीं शिरिं गंगेचा ओघाचि जो धरितो ॥धृ० ॥ ललाट नेत्रें चपलेपरि जो तेजाचि पसरीतो ॥ १ ॥ केतकिपत्रासम शशिलेखा सामधि मिरवीतो ॥ २ ॥

सूत्रधार—पुरें, पुरें, सकल भुवनांचा दीप असा हा भगवान् सूर्य उदयाचलावर येत आहे याची अगोदर स्तुति केली पाहिजे.

साकी.

दिवाकरा मी वंदन करितों तव पदारविंदा-
ते ॥ पातक माझें हरुनी देई अत्युत्तम वाणीते ॥
जीणें सकला या ॥ समर्थ होइन तोषाया ॥ १ ॥

(पडद्याकडे पाहून) मारिषा, भगवान् काळप्रियनाथ याच्या यात्रे करितां जमलेल्या पंडित जनांनीं मनोरंजना करितां कांहीं अपूर्व नाटक करून दाखविण्याविषयीं मला आज्ञा केली असतां तूं अजून कां बरें पात्रें सजवावयाला लागला नाहींस?

नट—(प्रवेश करून) महाराज, पंडित जनांनीं त्या नाटकांत जे गुण असावेत ह्मणून सांगितलें; त्या गुणांचें नाटक आपणाजवळ नाहीं.

सूत्रधार—मारिषा, पंडितानां कोणत्या गुणांचें नाटक पाहिजे?

नट—ते ह्मणतात कीं, त्या नाटकांत अनेक प्रकारचे रस असावेत; मनावर ठसणारीं मित्रत्वाचीं कृत्यें दाखविलीं असावींत; समर्याद मदन चरित्र असावें आणि मनोरंजक कथा असून पात्रांच्या अंगीं भाषणचातूर्य असावें.

सूत्रधार—मारिषा, त्या गुणांनीं भरलेलें नाटक मजजवळ आहे.

नट—तें कोणतें महाराज?

सूत्रधार—एक:—

[stamp]

साकी.

भवभूतीकृत मालतिमाधव प्रिय जें सकला झालें ॥ तें चातुर्यें संगीतीं मी संक्षेपानें रचिलें ॥ सुखवूं रसिका या ॥ प्रयोग त्याचा दावुनिया ॥ १ ॥

नट—ठीक आहे तर आज भवभूतींच्याच नाटकानें सभाजनांचें मनोरंजन करूं.

सूत्रधार—तर मग चल आतां या नाटकांत प्रथम जी कापालिकपंथाचीं पात्रें कामंदकी, व अवलोकिता यावयाचीं तीं लौकर सजवून पाठवून देवूं.

नट—ठीक आहे. (असें म्हणून दोघे जातात.)

ही प्रस्तावना झाली.

---

(तदनंतर भगवीं वस्त्रें नेसलेल्या कामंदकी व अवलोकिता प्रवेश करितात.)

कामंदकी—वत्से, अवलोकिते,

अवलोकिता—काय आज्ञा भगवती ?

कामंदकी—

(पद) चाल. हरिणाचा ध्वज ज्यावरिही.

कार्यभार जो मी उचलीला ॥ सामर्थि येवो यश तें मजला ॥ भूरिवसूची मालति तनया ॥ देवरातसुत माधवजाया ॥ ममयत्नानें ती होउनिया ॥ विलया नेवो हच्चिंतेला ॥ १ ॥

(शुभ शकून झालासे दाखवून) वत्से, हा माझा डावा डोळा लवतो आहे; यावरून मीं आरंभलेलें कार्य लवकरच शेवटास जाणार, असें मला वाटतें.

**अवलोकिता**—भगवति, आपण भगवींवस्त्रें नेसून निर्वाह करीत असतां अमात्य भूरिवसू तुह्मांला अशा काळजीच्या कामांत घालतो; व तुह्मीही संसार पाशांतून एकदां निघालेलें मन पुनः तिकडे लावतां याचें मला मोठें नवल वाटतें.

**कामंदकी**—वत्से, यांत तुला नवल तें कसलें वाटलें? भूरिवसूनें या कार्याकडे जी माझी योजना केली आहे ती केवळ स्नेहासाठीं. कारण, ज्यावेळीं आह्मी विद्याभ्यासाकरितां एके ठिकाणीं राहिलों होतों, त्यावेळीं माझ्या साक्षीनें भूरिवसू व देवरात यांची अशी शपथ झाली होती कीं, आपण एकमेकाशीं अपत्य संबंध करूं; आणि ह्मणूनच देवरातानें माधवाला सांप्रत विद्या करण्याकरितां व भूरिवसूला शपथेची ओळख देण्याकरितां येथें पाठविलें आहे.

**अवलोकिता**—जर त्यांची अशी शपथच झालेली आहे; तर अमात्य भूरिवसू आपणच होऊन माधवाला मालती कां देत नाहीं? तो तर त्याविषयीं इतका कांहीं परकेपणा दाखवतो कीं, कोणी ह्मणेल त्याला माधवाचें नांव देखील माहीत नाहीं.

**कामंदकी**—वत्से, याचें कारण असें आहे कीं, राजाच्या प्रीतीतला जो अमात्यनंदन त्यानें आपणासाठीं

[stamp]

मालतीला भूरिवसूजवळ राजाकडून मागणी घातली तेव्हां नाहीं म्हटलें तर राजाला राग येईल ह्मणून त्याच्या तोंडावर 'तुह्मी आपल्या कन्येचें वाटेल तें करण्यास समर्थ आहां' असें त्यानें बोलून आंतूनही खटपट करावयाला मला सांगितली; आतां तो माधवाविषयीं परकेपणा कां दाखवतो ह्मणशील तर तें केवळ सोंग आहे—

ना-८८

( पद ) चाल. ओळखते लहान होता मी ही

पाहुनिया माधवाते निजकन्या सुंदरी ॥ मोहावी प्रेम तीच्या निपजावें अंतरीं ॥ कपटानें नंदनाते फसवावें सापरी ॥ म्हणुनीया भाव ऐसा दावीगे तो वरी ॥ १ ॥

अवलोकिता—भगवति, आता सर्व मला कळून आलें. मी ही तुमच्या आज्ञाप्रमाणें रोज माधवाला मालतीच्या वाड्यावरून घेऊन जात असते.

कामंदकी—मालतीची सखी लवंगिका हिजकडून हें मला कळलें आहे.

अवलोकिता—आणखी मालतीनें करमणुकीकरितां माधवाची तजवीर काढली आहे; व ती लवंगिकेनें मंदारिकेजवळ दिली आहे.

कामंदकी—लवंगिकेनें हें चांगलें केलें कारण माधवाचा हुजऱ्या कलहंसक हा मंदारिकेच्या नादीं आहे; तेव्हां तिजपासून ती तजवीर त्याला मिळून तो ती माधवाला दाखवील.

अवलोकिता—शिवाय आज कामदेवाच्यायात्राकरितां मी माधवाला मदनोद्यानांत पाठवलें आहे; व

तेथें मालतीही जाणार आहे; तेव्हां त्या दोघांची तेथें नजरानजर होईलच.

कामंदकी—शाबास वत्से ! आज तूं हें मोठें चातुर्याचें काम केलेंस; या बद्दल तुझी तारीफच केली पाहिजे.

अवलोकिता—भगवति, माधवाचा बाळमित्र मकरंद याला जर नंदनाची बहीण मदयंतिका मिळवून दिली तर हें एक माधवाचें दुसरें प्रिय केलें असें होईल.

कामंदकी—वत्से, तें माझ्या लक्षांत आहें ; व त्या कार्याकडें मी बुद्धरक्षितेची योजना केली आहे. बरें चल आतां आपण माधवाचा समाचार घेऊन नंतर मालतीकडे जाऊं.

अवलोकिता—ठीक आहे चला तर.

कामंदकी—( मनांत ) मालती फार थोर मनाची आहे ; तर तिजबरोबर जो प्रसंग करणें तों जपूनच केला पाहिजे. देव करो आणि—

( साकी )

जशि शरदांतिल कौमुदि कमलां विकसवि मालति तैसी ॥ माधवास या प्रेमें भुलवे; अनुपम गुण दोघांसी ॥ ज्यानें दिधले ते ॥ तत्फल लाभो या विधितें ॥ १ ॥

( दोघी जातात )

( हा विष्कंभक झाला. )

## प्रवेश १ ला.

(तदनंतर हातांत तजवीर घेऊन कलहंसक प्र० क०)

कलहंसक—मदनाचा सौंदर्य गर्व घालवणारा व मालती गंभीर मनाची असतां तिला ही मोहित करणारा माझा धनी माधव या वेळीं कोठें भेटेल बरें? मी तर फिरून फिरून दमलो बुवा! आतां क्षणभर या बागेंत बसून विसांवा तरी घेतों; मग करीन माधव; मकरंदांचा शोध. (बसतो; व मकरंद प्र. क.)

मकरंद—अवलोकितेनें माधव मदनोद्यानांत गेला ह्मणून सांगितलें; तर आतां तिकडेंच जावे; (पुढें पाहून) अरे, हा माझा मित्र तर इकडेच येत आहे; याची आज पहा काय दशा झाली आहे ती—

### साकी.

तेजहीन हें शरीर होउनि मंदगती ती झाली॥
श्वासा सोडित चाले नयना अंधारी तशि आली॥
आहे मदनाची ॥ दुःसह पीडा ही साची ॥ १ ॥

(तदनंतर वर्णन केल्याप्रमाणें माधव प्र. क.)

माधव—

(पद) चाल. दृष्टिस पडल्या पासुनि ही

सा शशिवदनेपाशीं गेलें ॥ मन माझें जें तेथें रमलें ॥ नाफिरें मागें कधिहीं जरि मी बळेंचि ओढुनि सा आणियलें ॥ धृ ॥ दुःसह शर तो रतिनाथाचा ॥ गांजितसे कीं मजला साचा॥ लज्जा सजुनी नय सांडुनिया धैर्य तसें हें सोडुनि दिधलें ॥ १ ॥

अहो, काय माझी ही स्थिति झाली तरी.

साकी.

संनिध सखिच्या असतां गमलें हें अमृताच्या डोहीं।
मन्मन बुडलें नच तिजवांचुनि सुचलें दुसरें कांहीं।
परि मज आतां तें ॥ दीक्षाग्निसम तापवितें ॥ १ ॥

मकरंद—मित्रा, माधवा, इकडेयें; तिकडे कोणीकडे चाललास?

माधव—कोण? मित्रा, मकरंदा—

मकरंद—मित्रा, सांप्रत ऊन्ह फार झाले आहे; म्हणून दोन घटका येथें या कांचन वृक्षा खालीं बसून विसावा घेऊन नंतर घरीं जाऊं.

माधव—जसें मित्राच्या मनाला आवडेल तसें. ( दोघें बसतात. )

कलहंसक—माझा धनी आपल्या मित्रासह याच बागेंत बसला आहे; तर आतां त्याला हें मालतीनें काढलेलें त्याचें चित्र नेऊन दाखवतों; अथवा, आतांच काय घाई आहे; यानां जरा विसावा घेऊं द्या. मग सावकास दाखवतां येईल.

मकरंद—मित्रा, आज कामदेवाच्या यात्रेकरितां नगरांतिल सर्व सुंदर स्त्रिया मदनोद्यानांत गेल्या होत्या व तेथें तूही गेला होतास; तेव्हां तेथें तुला कांहीं तरी होऊन तूं मदनाच्या झपाट्यांत सांपडला आहेस; असें तुझ्या चर्येवरून मला वाटतें.

माधव—( लाजतो. )

मकरंद—अरे, असा लाजतोस् कां ? या मदनानें मोठमोठे देव देखील जिंकून टाकले ; मग तेथें तुझी मानवाची काय कथा ? काय झाले असेल तें सर्व सांग. त्या बद्दल तुजकडें दोष मुळींच नाहीं.

माधव—मित्रा, तुला न सांगावे तर कोणाला सांगावयाचे आहे ? ऐक, आज अवलोकितेनें सांगितल्यावरून मी मदनोद्यानांत गेलों होतो ; व कामदेवाच्या मंदिरांतली सर्व शोभा पाहून अंगणांत एक बकूलीचें झाड होतें ; त्याखालीं बसलों ; व कर्मणुकीकरीतां तेथें गळून पडलेलीं फुलें वेंचून त्याचा चातुर्यानें एक हार गुंफावयाला लागलों ; इतक्यांत मदनाची केवळ चालतीबोलती विजयपताकाच अशी एक सुंदर स्त्री तेथें आली. मित्रा, तिचें वर्णन मी काय करूं ?—

(पद) चाल. त्रैलोक्याधिप इंद्रही.

**सौंदर्याचें सर्वसार तें मज वाटे एकचि झालें ॥ लावण्याच्या कोशाचें बा दैवतहें उदया आलें॥ विधुमृणाल कीं अमृताही या मदनानें तिजला घडिलें ॥ ऐशा सुंदर ललनेपाशीं मन माझें जाउनि रमलें ॥ १ ॥**

मित्रा, नंतर तिला जेव्हां मी निरखून पाहिले तेव्हां तिच्या पोषाखावरून ती कोण्या थोरामोठ्याची मुलगी असावी ; व तिचा कोणा भाग्यवंतावर लोभ जडून त्याच्या विरहानें ती झुरणीस लागली असावी ; असें मला दिसून आलें ; आणि मित्रा, तुला काय

सांगूं ! जेव्हां तिची माझी नजरानजर झाली तेव्हां तर कापराचें अंजन घातल्याप्रमाणें माझे डोळे थंड होऊन जरी तिच्या स्नेहापासून कांहीं अर्थ नाहीं; तरी तिजविषयीं माझें मनांत नाना तर्क आले.

**मकरंद**—मित्रा, माधवा, स्नेहापासून अर्थ नसतो असें जें तूं ह्मणतोस तें खोटें आहे. कारण—

(**पद.**) चाल थाट माट सदनीं नवा ही.

**विकसन ये कमला रवि उदय पावता ॥ चंद्रकांत पाझरतो इंदु देखतां ॥ स्नेहानें जडतें जें प्रेम अंतरीं ॥ त्या समर्थ वर्णाया ही न वैखरी ॥ १ ॥**

बरें; मित्रा, मग पुढें काय झालें ?

**माधव**—नंतर त्यावेळीं तिजजवळ ज्या तिच्या मैत्रिणी होत्या; त्यांनीं जशी कांहीं तिची माझी पूर्वीची ओळखच आहे असें दाखवून मला लक्षून तिची अनेक प्रकारे थट्टा केली.

**मकरंद**—काय ओळखही निघाली ह्मणतोस; तर मग यावरून तिची तुजवर पूर्वीची प्रीती होती असे वाटतें.

**माधव**—नंतर--

(**पद.**) चाल. ब्राम्हण कन्या नव्हे ही.

**मैत्रीणींचा विनोद ऐसा हरिणाक्षी जाणुनी ॥ चेष्टा करि मदनालक्षुनी ॥ क्षणोक्षणीं मज मर्यादेनें पाहे ती चोरुनी ॥ सुखवी हंसुनी गालातुनी ॥ यापरि माझें कटाक्षबाणें मानस हें जिंकुनी ॥ गेली निजसदना घेऊनी ॥ १ ॥**

मित्रा, या प्रमाणें तिचें आपणांवर प्रेम आहे असें वाटून जरी माझें मन तिजकडे अगदीं वेधून गेलें होते; तरी वृत्तीचा चंचलपणा कोणाच्या लक्षांत न यावा ह्मणून पूर्वीं आरंभलेला बकुलपुष्पांचा हार थोडासा गुंफावयाचा राहिला होता तो मी मोठ्या कष्टानें कसा तरी संपवला ; इतक्यांत तिचे परिजन येऊन त्यांसह ती चंद्रवदना हत्तिणीवर बसून नगरांत गेली. मित्रा मग तुला काय सांगू ? —

श्लोक. वसंततिलका.

जातां तिनें निजमुखा वळवोनि मागें ॥
पाहीयलें मज तदा अनुरागयोगें ॥
मी सद्विचार अवघे मग सोडियले ॥
मोहीं बळेंचि बघ हें मन गुंतवीलें ॥ १ ॥

कलहंसक—यांचें मन कोण्यास्त्रीनें आपणाकडे ओढून नेलें आहें वाटतें ; काय ती स्त्री मालतीच असेल ?

मकरंद—( मनांत )काय हो हा प्रीतीचा विलक्षण सपाटा तरी ! काय आतां याला मी तूं स्त्रीच्या नादीं लागू नकोस असा उपदेश करूं ? अथवा—

साकी.

तारुण्यामधिं हा येतां या मदनें निजबाणानें ।
ताडियलें या आतां होइल सुख नच उपदेशानें ॥ कामाहुनि नाहीं ॥ बलि या लोकीं कोणीही ॥ १ ॥
( उघड ) मित्रा, माधवा, ती गेली त्या वेळीं तिचें नांव, गांव शील याची तूं कांहीं चौकशी केलीस काय ?

माधव—ऐक. ती जेव्हां अंबारींत बसूं लागली तेव्हां तिच्या मैत्रिणी पैकीं एकजण अंमळशी थांबून मजकडे येऊन मला नमस्कार करून बोलली कीं, आपण गुंफलेल्या हारावर आमच्या राजकन्येचें, फारच मन बसलें आहे ; तर तो तिच्या गळ्यांत पडून तुमच्या चातुर्याची सार्थकता होवो.

मकरंद—किती तरी भाषण करण्याची विलक्षण शैली ही !

माधव—मित्रा, मग तिला मी ही कोणाची कोण असें विचारल्यावरून तिनें सांगितलें कीं ही अमात्य भूरिवसूची कन्या मालती ; व मी तिची सखी आहे. माझें नांव लवंगिका.

कलहंसक—कोण मालती ? तर मग मदनानें आपली तलवार गाजवाला फारच चांगली जागा पाहिली.

मकरंद—कोण ? अमात्य भूरिवसूची कन्या मालती ? मित्रा, ती तर थोर कुळातली आहे ; भगवती तिला फार वाखाणीत असते; पण राजानें नंदनासाठीं तिला अमात्याजवळ मागणी घातली आहे अशी लोकांत दाट वदंता आहे.

माधव—तें कांहीं असो ; मजजवळ मागताक्षणींच मी तो हार तिला दिला, व मालतीकडें माझें मन वेधूनगेल्यामुळें जरी तो एका अंगाला नीट गुंफला गेला नव्हता तरी तिनें तो प्रसाद म्हणून घेतला ; व निघून गेली; आणि मग मी इकडें आलों.

**मकरंद**— मित्रा, माधवा, जसें मालतीविषयीं तुझ्या मनांत प्रेम उद्भवलें आहे, तसें तुजविषयींही तिच्या मनांत उद्भवलें आहे; व असें होणें ही स्वाभाविक आहे. पण तिनें तुला पूर्वीं कोठें पाहिलें असावें हें कांहीं अजून माझ्या लक्षांत येत नाहीं. पहा बरें, अशा कुलीन व सुशील कुमारिका एकावर मन ठेवून दुसऱ्याविषयीं प्रेम कधींही दाखवीत नाहींत.

**कलहंसक**—( पुढें येऊन ) ही पहावी तजबीर! ( ती दाखवतो. )

**मकरंद**—( पाहून ) कलहंसका, कोणीरे काढली ही माधवाची तजबीर?

**कलहंसक**—जिनें त्यांचें मन हरण केलें त्या मालतीनें काढली.

**मकरंद**—पण तिनें काढलेली ही तजबीर तुला कशी मिळाली?

**कलहंसक**—मालतीची सखी लवंगिका, हिनें ही तजबीर मंदारिकेजवळ दिली होती; व तिजपासून मला मिळाली.

**मकरंद**—बरें; कलहंसका, मालतीनें माधवाची तजबीर कां काढली? याविषयीं तुला कांहीं कळलें आहे कां?

**कलहंसक**—होय; त्यांचें वियोगदुःख क्षणभर विसरावें, ह्मणून तिनें ही तजबीर काढली?

मकरंद—मित्रा, माधवा, आतां सर्व चिंता सोडून दे.

पद. चाल. मी कुमारनीहि कुमारीही.

विधु कांतीसम तव नेत्र जी प्रमदा सुखकर झाली ॥ तन्मानें तूं भरुनी सखया तुजवर ती आहे भुलली ॥ चाल ॥ तुज एकचि प्रसवालि जननी ॥ लाभावी तुज ती म्हणुनी ॥ विधि मन्मथ झटती मानी ॥ तरि आतां तिजला आपुली ॥ १ ॥

बरें पण, मित्रा, तुला जिनें मोहून टाकलें, ती मालती फारच देखणी असेल यांत संशय नाहीं ; तर तिचें चित्र तूं येथें काढ बरें ; ह्मणजे ती माझ्या तरी दृष्टी पडेल.

माधव—जसें तुला आवडेल तसें. कलहंसका, चित्र काढावयाला कलमदान आणि रंगाचा पेला घेऊन ये बरें.

कलहंसक—( तसें करितो. )

माधव—( कांहींसे चित्र काढून ) मित्रा, मकरंदा, त्या सुंदरीचें चित्र पुरें काढवत नाहीं. पहा—

दिंडी.

प्रेमजल तें ये कसें लोचनाना ॥
तिची मूर्ती विसरवी देहभाना ॥
घर्मसलिलें होउनी हात ओले ॥
चित्र काढाया नच उपाय चाले ॥ १ ॥

तथापि, आरंभलेंच आहे त्या अर्थी कसें तरी संपवलें पाहिजे.

( बऱ्याच वेळानें संपवून मकरंदाजवळ देतो. )

**मकरंद**—मित्रा, किती या मालतीचें हें सौंदर्य! एकूण तुझें जे मन तिनें मोहून टाकलें तें ठीकच (पाहून) अरे वः! तूं तर लागलीच पदही तयार करून खालीं लिहिलेंस. मित्रा, वाच पाहूं तें.

**माधव**—( वाचतो. )

पद. चाल. तुजसम मत्प्रेम असुनिही.

**स्वाभाविक सुखकर या भूतलावरी ॥ जरि दुसरे बहु असती विषय ते तरी ॥ ज्या दिवशीं पाहिलि ती सुभग सुंदरी ॥ मज वाटे शुभदिन तो एक अंतरीं ॥ १ ॥**

( मंदारिका प्रवेश करिते. )

**मंदारिका**—कलहंसका, मघां मी दिलेली तजबीर कोठें आहे? देतो परत.

**कलहंसक**—ही घे. ( तजबीर देतो. )

**मंदारिका**—कलहंसका, या पाटीवर हें मालतीचें चित्र कोणी व कां काढलें?

**कलहंसक**—तिनें ज्याकारितां ज्याचें चित्र काढलें; त्यानें त्याचकारितां तिचें काढलें.

**मंदारिका**—( मनांत ) अहाहा! या चित्रानें तर प्रथमच विधात्याच्या चातुर्याचें फळ दिसून आलें!

मकरंद—मंदारिके, या चित्राविषयीं तुझा प्रिय सखा जे सांगतो, तें सर्व खरें आहे काय ?

मंदारिका—होय महाराज, सर्व खरें आहे.

मकरंद—मालतीनें माधवाला पूर्वी कोठें पाहिलें होतें ?

मंदारिका—तिनें त्यांना रस्त्यांतून जातानां आपल्या महालाच्या खिडकींतून पाहिलें होतें.

मकरंद—मित्रा, माधवा, आपण बहुत करून अमात्यभूरिवसूच्याच वाड्यावरून बाजारांत जात येत असतो ; तेव्हां मंदारीका जें बोलतें तें जुळतें.

मंदारिका—(मनांत) भगवान् कामदेव याचें हें उत्तम चरित्र माझी सखी जी लवंगिका तिला आतां मी जाऊन कळवते. (जाते.)

मकरंद—मित्रा, सूर्य मध्यान्हीं आला ; ऊन फार झालें तर चल आतां आपण घरीं जाऊं. (उठतात)

माधव—(मनांत) मला फार भय वाटत आहे.

साकी.

प्रभातकालीं सखिच्या गालीं चित्रपत्रवल्लीते ॥
सखि काढिति त्या घर्मे पुसतां त्यांच्या चातुर्याते ॥
यश नच तें येई ॥ भ्रमगति नकळे तशि होई॥२॥

(उघड) मित्रा मकरंदा, पहा माझी काय स्थिति झाली आहे ती—

श्लोक—शार्दूलविक्रीडित.

उत्कंठा सखया तिची बहु मला लागोनिया ताप हा॥टाकी सर्व पिळोनि अंग ह्मणुनी कांहीं सुचेना पहा ॥ रोमांचीं भरलों तसाच मुकलों मी इंद्रियांच्या बला ॥ पोळें चित्त समर्थता मुळि नसे बोलावयाला मला ॥ १ ॥

( असें झाल्यावर सर्व जातात. )

पहिला प्रवेश समाप्त.

---

## प्रवेश दुसरा.

( तदनंतर आसनस्थ मालती व लवंगिका प्र. )

मालती—

( पद. ) चाल. त्या मदनमनोरमरूपीं हीं—

पाहुनिया मदना जैसी ॥ उत्कंठा लागे रतिसी ॥ ध्रु ॥ त्यापरि तो गुणनिधि बघुनी ॥ मार्गातुनि जातां नयनीं ॥ गेले मी त्यासी भुलुनी दुर्लभ कीं मजला असुनी ॥ चाल ॥ येउनिया निशिदिनिं मनीं तो ॥ जिव तळमळतो ॥ तद्विरहासी ॥ सोसाया बल नच मजसी ॥ १ ॥

( उघड ) सखे, लवंगिके, या हाराची ओंवण एका अंगाला बरोबर आहे ; पण दुसऱ्या अंगाला किंचित् वांकडी तिकडी झाली आहे नाहीं बरें ?

लवंगिका—सखे, ती अशी वांकडीतिकडी होण्याला कारण तूंच आहेस ?

मालती—मी गे कशी कारण आहे ?

लवंगिका—मदनोद्यानांत तूं दृष्टपडून त्याला वेडावून टाकलेंस ; मग त्याचें हाराकडे मन कसें बरें लागावें ?

मालती—सखे, लवंगिके, दुसऱ्याच्या मनांला समाधान होण्यासारखें बोलावें असा तुझा स्वभावच आहेना ?

लवंगिका— यांत मी खोटें तें काय बोललें ? तूंच पहा कीं, ज्यावेळीं तूं त्या बकुलीच्या झाडाखालीं उभी होतीस ; त्यावेळीं त्या महाभागाचे डोळे वारंवार तुझ्या मुखाकडे लगटत असतां तो त्याना बळेंच खालीं करून आपलें मन हाराकडें आहे असें दाखवी; व क्षणोक्षणीं तुला चोरून पाही. हा सर्व प्रकार कां तूं पाहिला नाहींस ? पण आपलें उगीच लोकांकडून बोलवावयाचें.

मालती—पण सखे, हे त्याचे स्वाभाविक विलास नसतील कशावरून ? आपणांला उगीच भ्रांतीनें तसें वाटत असेल.

लवंगिका—तर मग मला वाटतें कीं, त्यासमयीं तूं जे हावभाव केलेंस ते देखील स्वाभाविकच झाले असतील नाहीं बरें ?

मालती— (लाजते )

लवंगिका—सखे, मालती, आणखी तुला सांगते. तूं जी माधवाची तजवीर काढली होतीस; ती मी मंदारिकेजवळ दिली असतां तिजपासून ती कलहंसकानें घेऊन माधवाला दाखवली; तेव्हां त्यानें ती पाहून आपला मनोरथ सफल होणें कठीण ह्मणून तुझी विरहवेदना कांहीं कमी करण्याकरितां त्या पाटीवर तुझें चित्र काढलें आहे. तें हें पहा–(तजवीर देते.)

मालती—(पाहून) मेलें माझें मन किति तरी अविश्वासी! अजून त्या महा भागाच्या प्रेमाविषयीं मला संशय येतो. पण या खालीं लिहिलेल्या पदांत त्यानें ते सर्व उघड करून दाखविलें आहें—(वाचतें)

(पद.) चाल. तुजसम मत्प्रेम ही—

**स्वाभाविक सुखकर या भूतलावरी ॥ जरि दुसरे बहु असती विषय ते तरी ॥ ज्या दिवशीं पाहिली ती सुभग सुंदरी ॥ मज वाटे शुभदिन तो एक अंतरीं ॥ १ ॥**

हे महाभागा, तुझें दर्शन त्यावेळीं मात्र आनंद देतें; पण परिणामीं तें मोठ्या दुःखाला कारण होतें; यावरून ज्या तरुणींनीं तुला पाहिले नसेल त्या दैववान् आहेत; कारण त्या आपलें मन स्वाधीन ठेवूं शकतील.

लवंगिका—सखे, इतकें झालें तरी तुला समाधान नाहीं ना?

मालती—सखे, लवंगिके, इतकें तें काय झालें ?

लवंगिका—सखे असें झालें कीं जाईच्या फुलासारखी सुकुमार तूं ज्याकरितां इतकें दुःख करतेंस ; त्यालाही मदनापासून पीडा होत आहे.

मालती—तो महाभाग खुशाल असो. आतां मला शांतता मिळणें दुर्घट आहे—

(पद.) चाल. केला होता घाताचि ही—

**या शरिरीं जी विषसम गेली प्रीती पसरुनि साची ॥ तापद होई मज ती सखये ज्वाला जणु वन्हींची ॥ ज्वरसम माझ्या सर्वांगातें व्याकुल करूनि टाकी ॥ मज रक्षाया समर्थ आतां नच कोणी उरला कीं ॥ १ ॥**

लवंगिका—सखे, मालती, विनाकारण असें दुःख कां बरें करतेंस ? जसें तुझें मन त्यावर जडलें आहे तसें त्याचेंही तुजवर जडलें आहे ; तर मग असा सुस्वरूप व गुणवान् पति करून घेण्याला उशीर कां करतेंस ? या संसारांत असा लाभ होणें दुर्लभ आहे ; त्याकरितां जरी तुजकडून एखादें साहस घडलें तरी त्याबद्दल लोक तुझी वाखाणणीच करतील.

मालती—अगे, साहस करण्याविषयीं मन वळवणारे ; चल नीव येथून ; तूं मालतीची मात्र काळजी करतेंस ; पण तिच्या नांवलौकिकाची कांहींच पर्वा बाळगीत नाहींसना ? पण मी तुला खचीत सांगते कीं,

श्लोक-कामदा.

जनकजननिच्या लौकिकाहुनी ॥ गुणनिधी न तो
प्रिय मला मनीं ॥ प्राण सोडुनी जाय हा जरी ॥
साहसा कधीं मी न गे करी ॥ १ ॥

लवंगिका—(मनांत) यावेळीं इचें मन वळवण्याला भागवति कामंदकी येतील तर बरें होईल.

( इतक्यांत द्वारपालिका प्र. क. )

द्वारपालिका—बाईसाहेब तुमच्या समाचाराला भगवती कामंदकी आल्या आहेत.

लवंगिका—( मनांत ) वाहवा ! माझ्या मनांत होतें तेंच झालें ( उघड ) मग त्यांना येण्याला इतका विलंब कां ? जा लौकर घेऊन ये.

( द्वारपालिका जाते. व अवलोकितसह कामंदकी प्र० क० )

कामंदकी—लग्नाच्या कामांत वधुवरांची एकमेकांवर प्रीति जडणें यासारखी दुसरी अनुकूल गोष्ट कोणतीच लागत नाहीं; ह्मणून मालतीनें माधवाची तसवीर काढली; व माधवानें बकुल पुष्पाचा हार तिला दिला हें कळल्यापासून मला फार आनंद वाटत आहे; कारण या प्रेमाच्या योगानें त्यांचा सर्वकाल सुखांत जाईल.

अवलोकिता—भगवति, ही पहा मालती येथें बसली आहे.

कामंदकी—ही त्यावेळीं ! कशी दिसत आहे—

अंजनीगीत.

मदनें हिजला कृश जरि केली ॥ तरि शोभे ही जैसी कदली ॥ क्षीणची विधुची मूर्ती धवली । नेत्रां सुखवीते ॥ १ ॥ सुंदर रूपें रमणियता ती ॥ स्वाभाविक ज्या ठायीं वसती ॥ कृति मदनाची शोभा देती ॥ अतिशय कीं तेथें ॥ २ ॥

मालती—भगवति, आपणाला मी नमस्कार करते.

कामंदकी—मुली, तूं ज्याची इच्छा करतेस तो तुला मिळो. ये बैस.

( सर्व जणी बसतात. )

मालती—कां भगवति, खुशाल आहानां?

कामंदकी—( सुस्कारा टाकून ) होय मी खुशाल आहे.

लवंगिका—( मनांत )भगवतीच्या कपट नाटकाला आरंभ झाला. ( उघड ) भगवति, आपण बोलतांना गळा दाटून येतो; सुस्कारे टाकतां; तर असें होण्याला कारण काय बरें झालें?

कामंदकी—ज्यानें भगवीं वस्त्रें घेतलीं; त्यानें कधीं लोभांत पडूं नये; पडलें ह्मणजे असें दुःख होतें.

लवंगिका—आजच भगवतीला इतकें दुःख कसलें बरें झालें?

कामंदकी—वत्से, लवंगिके, हे तूं विचारूं नयेस व मी सांगूं नये; हे पहा, या मालतीच्या बापानें

हिची विटंबना मांडून हिच्या गुणांची व रूपाची कशी माती करून टाकली आहे ती ?

मालती—( मनांत )

पद चाल धनहीन असा होयही

**दैवकसें प्रतिकुल हें आज जाहले ॥ नंदनास ममजनकें मला अर्पिले ॥ कन्यहानि नृपवच सा थोर वाटलें ॥ मज माधवसंगमसुख तें न लाभलें॥१॥**

**लवंगिका**—भगवति, असें झालें आहे खरें; राजाच्या ह्मणण्याला रुकार देऊन मालती नंदनाला देण्याचें ठरवल्यामुळें सर्व लोक अमात्याला दोष देतात.

**कामंदकी**—किती तरी हा निर्दय भूरिवसू ! एकाद्या कुलीन व सुशील मुलाला आपली मुलगी देण्याचे टाकून भलत्यालाच देतो ; अथवा, ज्यानें केवळ राजाच्याच लोभाकडे लक्ष दिले, त्याला मुलीची दया कोठून येणार ?

**मालती**—( मनांत ) बाबा, असें करतानां तुह्माला माझी कांहींच कांहो दया आली नाहीं ?

**लवंगिका**—भगवति, आपण ह्मणतां तेंच खरें ; तसें नसतें तर अशा ह्मातान्या नवऱ्याला अमात्य आपली एकुलती एक मुलगी देण्याचें कां कबूल करतां ?

**मालती**—हाय हाय देवा ! काय ही आग मजवर कोसळली ?

**लवंगिका**—अहो, भगवति, या मालतीच्या बापाला कांहीं तिची दया येत नाहीं ; तर तुम्ही तरी आतां इला या जिवंतमरणापासून तारा ; ही तरी तुमची धर्मकन्याच आहे.

**कामंदकी**—वेडे पोरी ; येथें माझ्या भगवतीपणाला काय चालावयाचें आहे ! मी काय करणार ? बहुतकरून मुलींचें बरें वाईट तिच्या बापाच्या किंवा दैवाच्या हातीं असते ; आतां प्राचीनकथेकडे जर लक्ष दिलें तर पुष्कळ राजकन्यांनीं पित्याच्या संमतीवाचून आपणाला आवडले ते पति केले आहेत ; पण तसें साहस करण्याविषयीं इला सांगणें आह्मांस शोभत नाहीं. मग—

साकी.

**रूपहीन सावरदारासिका भूपप्रिय सचिवाला ॥ अमात्य अपुली कन्या अर्पुनि पावो आनंदाला ॥ इंदुकला जैसी ॥ लाभावी कीं राहूसी ॥ १ ॥**

**मालती**—( मनांत ) भगवतीच्या मनांतही मी साहस करावें असें आहे काय ?

**अवलोकिता**—भगवति, आपणाला येऊन बराच वेळ झाला. घरीं माधवाच्या शरीराला समाधान नाहीं तर आतां चलावयाचें नां ?

**कामंदकी**—होय चलावयाचें. वत्से, मालती आतां मी घेते तुझा निरोप.

**लवंगिका**—( कानांत ) सखे, मी भगवतीला माधवाची हकीगत विचारूं कां ?

**मालती**—होय गडे विचार ; मला देखील ती ऐकावयाची आहे.

**लवंगिका**—भगवति, आपण ज्यावर इतका लोभ करितां तो माधव आहे तरी कोण ?

**कामंदकी**—वत्से, तो कोण आहे हे मी काय सांगावें ; व तें सांगण्याचें ही येथें कांहीं कारण नाहीं. त्यांला समाधान नाहीं ह्मणून मी आतां जाते.

**लवंगिका**—भगवति, त्याची हकीगत ऐकण्याविषयीं माझ्या सखीला फार उत्कंठा लागली आहे ; तर कसेंही करून सांगाच.

**कामंदकी**—तुझ्या सखीचीच जर ऐकण्याची इच्छा असेल तर परवा शिवरात्र आहे; त्या दिवशीं सकाळीं तूं तिला शिवालयाजवळील कुसुमाकर बागेंत घेऊन ये; ह्मणजे मी तेथें येऊन सर्व सांगेन.

**लवंगिका**—ठीक आहे. आह्मी आपल्या आज्ञे बाहेर नाहीं.

**कामंदकी**—(एकीकडे) अवलोकिते, परवां ज्या वेळीं मालती कुसुमाकर बागेंत येईल ; त्या वेळीं तूं माधवाला तेथें पाठवून दे.

**अवलोकिता**—ठीक आहे, मी तुमच्या आज्ञेप्रमाणें करिते.

**कामंदकी**-बाळे मालती, येतें आतां मी (मनांत) वाहवा ! मालतीचे मन वळवण्याचें काम एकाद्या

चतुर दूतीकडून जें करवावयाचे; तें मीच तिऱ्हाईत राहून केलें—

पद. चाल. काय परम-रमणीय सखीचेंही—

**नंदन निंदुनि तिस निर्दयता जनकाची कथिली ॥ पति मिळवाया साहस करण्या संमति ती दिधली ॥ ऐकायासी चरित्र याचें उत्कंठा मी तिस लावियली ॥ विधिबलयोगें आतां वाढो यांची प्रीती जी ही जडली ॥ १ ॥**

( असें झाल्यावर सर्व जातात. )

**अंक पहिला समाप्त.**

# अंक दुसरा.

( तदनंतर बुद्धरक्षिता प्र० क० )

**बुद्धरक्षिता**—भगवतीच्या आज्ञेप्रमाणें मी मदयंतिकेजवळ मकरंदाचे गुण वर्णन करून त्याविषयीं तिच्या मनांत असें कांहीं प्रेम भरवून दिलें आहे कीं, त्याला कधीं एक वार डोळ्यांनीं पाहीन असें तिला होऊन गेलें आहे. आज भगवति माधवाविषयीं मालतीचें मन वळवण्याकरितां शिवालयाजवळील कुसुमाकर बागेंत गेली आहे व तिनें तेथें माधवालाही येण्याला सांगितलें आहे. तेव्हां माधवाबरोबर मकरंदही तेथें येईलच; तर मग मी आतां ही संधी साधून मदयंतिकेला तेथें घेऊन जाते, ह्मणजे मालती माधवाप्रमाणें त्या दोघांचीही नजरानजर होऊन एकमेकांविषयीं एकमेकांच्या मनांत प्रीती जडली ह्मणजे मी केलेल्या यत्नाचें सार्थक होईल. असो, बराच वेळ झाला. माधव मकरंदासह कुसुमाकर बागेंत गेला देखील असेल; तर आतां लौकर मदयंतिकेला तेथें घेऊन जावें.

( असें ह्मणून जाते. )

हा विष्कंभक झाला.

( तदनंतर माधव प्र० क० )

माधव—अहाहा! प्रातःकालीं या कुसुमाकर बागेची किती तरी ही शोभा दिसत आहे.

पद. चाल. वसंति बघुनि मेनकेलाही—

कोकिल कुल हें उपवनिंया ॥ गायन करितें सहकारांच्या शिखरीं बैसुनिया ॥ नवमधु तैसा सेवुनिया ॥ मधुकर करिती गुंजारव तो अंतरिं तोषुनिया ॥ सुगंध मारुत येउनिया ॥ उत्सुक मजसी करितो सखिला आलिंगन द्याया ॥ १ ॥

( पाहून ) अहो, मालती आली; ही सांप्रत फारच रमणीय दिसत आहे—

साकी.

चंपकमाला विमर्द होता सुकुनी जाते जैसी ॥
या सुंदरिची तनु याकालीं मजला दिसते तैसी ॥
नेत्रां सुखवीते ॥ मत्कामाग्नी पेटवीते ॥ १ ॥

(तदनंतर लवंगिकेसह मालती प्र० क०)

मालती—( मनांत )—

पद. चाल, धनहीन असाही.

दैव कसें प्रतिकुल हें आज जाहलें ॥
नंदनास मम जनकें मला अर्पिलें ॥
कन्येहुनि नृपवच सा थोर वाटलें ॥
मज माधवसंगमसुख तें न लाभलें ॥ १ ॥

( तदनंतर कामंदकी प्र० क० )

**कामंदकी**—मालतीला तर मी इतकें कांहीं आपलें वेड लावून टाकलें आहे कीं, मी क्षणभर तिजपासून दूर झालें कीं, तिला मोठें दुःख होतें; मी घरीं जातानां अनेकवार माझ्या पायां पडून मला शपथा घालून लौकर परत येण्याविषयीं आग्रह करिते; परवां तिला माधवाचें चरित्र ऐकण्याविषयीं कुसुमाकर बागेंत येण्याला सांगितलें मात्र, तों ती माझ्या अगोदर येथें आली; असो, आतां माधवाविषयीं तिचें मन वळवण्याचें काम जें मला करावयाचें तें मी माधवा समक्षच करीन.

**लवंगिका**—सखे, चल आतां आपण कुंजवनांत जाऊन झाडांचीं फुलें तोडूं. (तसें करितात.)

**कामंदकी**—(मालतीला विनोदानें) मुली, पुरे, पुरे, दमलीस—

साकी.

दुःखें पाउल उचलिसि होसी समर्थ नच बोलाया ॥ शोभति जैसे मधुकण कमलीं घर्मबिंदु गालीं या ॥ होती प्रियविरहें ॥ श्रम तुज तनये किति पाहे ॥ १ ॥

**माधव**—भगवतीची भाषण करण्याची शैली विलक्षण आहे !

**लवंगिका**—भगवति, आपण अगदीं खरें बोलला.

कामंदकी—मुली, या चौरंगावर बैस, ह्मणजे जरा तुला समाधान वाटेल. ( सर्व जणी बसतात. )

मालती—(लवंगिकेच्या कानांत कांहीं सांगतें.)

लवंगिका—भगवति, आज आपण आम्हाला माधवाची हकीगत सांगणार आहानां?

कामंदकी—वत्से, त्याचें सर्व चरित्र सांगण्याला मी कांहीं समर्थ नाहीं; तर तुला संक्षेपानें सांगतें. विदर्भ राजाचा देवरात ह्मणून प्रधान आहे; तो सर्व धुरंधर पुरुषांचा शिरोमणीच असल्यामुळें त्याची कीर्ति या भूमंडळावर सर्वत्र गाजत आहे. तो कोण व कसा आहे; हें मालतीच्या बापाला माहीत आहे, त्या दोघांनीं एकाच गुरुपासून विद्या संपादन केली.

मालती—सखे, भगवतीनीं आतां ज्यांचे नांव घेतले; त्यांच्या गोष्टीं घरीं बाबा नेहमीं सांगत असतात.

कामंदकी—त्या देवराताच्या पोटीं, जसा पूर्वाचलीं सर्वांनां आनंद देणारा चंद्र उदयाला येतो; तसा सुरूप, सुशील, असा पुत्र जन्माला आला त्याचेंच नांव माधव.

मालती—सखे; तो महाभाग थोर कुलांतला आहे.

लवंगिका—सखे, असेल यांत नवल काय? समुद्रावांचून पारिजातक दुसरीकडे कां कोठें निपजणार आहे?

**कामंदकी**—नंतर तो माधव लहानपणींच विद्या करण्याचा निश्चय करून आपल्या मित्रासह येथें येऊन राहिला आहे; वत्से, लवंगिके, तुला काय सांगू जशी हीं मालती, तसाच तो माधव माझा केवळ प्राण आहे.

**लवंगिका**—भगवति, गुणवान् पुरुष कोणाला प्रिय असणार नाहीं?

**कामंदकी**—पण, वत्से, परवां तो मदनोद्यानांत कामदेवाच्या यात्रेला गेला होता; तेथें कोण्या स्त्रीला पाहून तिच्या विरहानें अगदीं वेडा होऊन गेला आहे. आणि तेव्हांपासून त्याला आपल्या सर्व मित्रांचा, आनंददायक पदार्थांचा, फार काय पण त्या सुंदर शरीराचा देखील कंटाळा आला आहे; कांहीं केलें तरी त्याला समाधान वाटत नाहीं.

**मालती**—(मनांत) ज्या स्त्रीला पाहून तो महाभाग इतका वेडा होऊन गेला आहे; ती स्त्री कोण बरें असेल?

**लवंगिका**—भगवति, ह्मणूनच परवां तुम्हाला त्याच्या शरिराला समाधान नाहीं; ह्मणून घरीं चलण्याविषयीं अवलोकिता घाई करीत होती.

**कामंदकी**—वत्से, लवंगिके, मी असें ऐकलें आहे कीं, ज्याप्रमाणें पौर्णिमेचा चंद्र उदयाला येतांच समुद्र खवळून जातो; त्याप्रमाणें या मालतीच्या मुखचंद्राला पाहून तो अगदीं मोहून गेला आहे.

**माधव**—अहो, दुसऱ्याचें मन वळवण्याविषयीं

भगवतीचा किती तरी हा अद्भुत प्रयत्न ! अथवा—

साकी.

जीच्या अंगीं पूर्णचि भरलीं शिक्षितवाक्चातुर्यें ॥ कालज्ञानी, शास्त्रज्ञानी, जी तिजला निज कार्यें ॥ करुनी घेण्या हीं ॥ दुर्घट येथें नच कांहीं ॥ १ ॥

कामंदकी—वत्से, आणि ह्मणूनच तो जिवाला त्रासला आहे; विरहीजनानां ज्या गोष्टी दुःखदायक आहेत त्या मरण यावें ह्मणून तो बळेंच सेवन करितो—

पद. चाल. होइल कलहही—

ज्यावरि कोकिल करिती ॥ गायन ऐशा सहकारांचे ॥ धृ० ॥ दर्शन घेई जाउनिया तो ॥ सुगंध मारुत सेवन करितो ॥ बैसे विधुचे किरणीं ॥ छत्रचि धरुनी करिं कमलाचें ॥ १ ॥ कुसुमें येता बकूलतरुची ॥ दुःसह छाया सोसी साची ॥ वांछुनि मरणा योजी ॥ उपाय यापरि नानापरिचे ॥ २ ॥

माधव—अहाहा ! कोणासही ठाऊक नाहीं असा कांहीं चमत्कारिक भगवतीच्या भाषणाचा प्रकार आहे.

मालती—सखे, तो महाभाग फारच वाईट कर्म करीत आहे.

कामंदकी—वत्से, लवंगिके, आधींच तो मुलगा शरिरानें नाजूक तशांतून त्याला कधीं दुःखांचें वारें देखील माहीत नाहीं; त्याची सांप्रत अशी स्थिति झाल्यामुळें त्याचा प्राण कसा राहील; याची मला फार काळजी लागली आहे—

माधव—मी केवढा दैववान् कीं, भगवती मजविषयीं इतकी काळजी वाहते.

मालती—हायहाय, सखे लवंगिके—

ठुंबरी.

प्रियकर तो या दशेला कैसा गे पावला ॥ धृ० ॥ गुणरूपानें या भूमीचा ॥ अलंकार जो झाला साचा ॥ गति त्याची ऐकुनी ही भय वाटतें मला ॥ १ ॥

लवंगिका—भगवति, आपण म्हणतां तसें असेल. या मालतीची देखील, राजमार्गांतून तो महाभाग माधव जात असतां त्याला वारंवार पाहून फार वाईट दशा झाली आहे. तिला कशांतही सुख वाटत नाहीं; मैत्रिणींचा सहवास तसाच उपवनविहार यांचा तिला अगदीं तिटकारा आला आहे; त्याच्या वियोगापासून झालेला ताप कमी करण्याकरितां ही नेहमीं चंद्रकांत मण्यांचे हार गळ्यांत घालते; कमलांच्या पानांची शय्या करून तीवर निजते; तशीच चंदनाची दाट उटी लावते; पण त्यापासून तो कमी न होतां उलटा वाढतच जातो. अहोरात्र ही त्याचें चिंतन करीत असते.

भगवति, तुम्हाला काय सांगूं हिची अशी दशा या डोळ्यांनीं बघण्यापेक्षां मरण येईल तर फार बरें असें मला वाटतें.

**कामंदकी**—वत्से, लवंगिके, तो माधवही गुणवान् व ही मालतीही गुणवती ; तेव्हां यांचें मन एकमेकाशीं मिळालेलें पाहून मला आनंद झाला ; पण तुझ्या सखीची सांप्रत ही अशी दशा पाहून मला फार वाईट वाटतें.

**माधव**—हें ऐकून भगवतीला जो आनंद झाला तो बरोबर आहे.

**कामंदकी**—अरेरे ! वत्से लवंगिके, फार कठीण प्रसंग आला आहे—

**पद** चाल. या विप्राच्या करींही—

शरिर ईचें सुंदर तैसें असतां हें सुकुमार ॥
संचरुनी हा मन्मथ करितो पीडा ह्या अनिवार ॥
वसंतकाळीं चांदणिरात्रीं इस करण्या अपकार ॥
बघ तैशामाधिं मलयाद्रीचा सुगंध सुटला गार॥१॥

**लवंगिका**—आणखी हें ही भगवतीला कळलें असेलच कीं, ही माधवाची तसबीर ; व हा माधवानें आपण गुंफून दिलेला बकुलपुष्पांचा हार याला माझी प्रियसखी केवळ प्राण मानते.

**माधव**—( पाहून )

**पद**. चाल. वीरा भ्रमरा ही—

बकुल माले धन्य धन्य तूं असती या भूवरी ॥

कठीं धरि तुजला सुंदरी ॥ कुचांग सखिचें पांडुर झालें पंकजतंतूपरी ॥ पडतां सुख मानिसि सावरी ॥ जैसी सुंदर पताक करिते फडफड सौधावरी ॥ तसी शोभसि तेथें खरी ॥ १ ॥

(इतक्यांत गडबडीनें बुद्धरक्षिता प्र. क.)

**बुद्धरक्षिता**—अहो, भगवति, धांवा, आमचे संरक्षण करा. हा पहा मेला पिसाळलेला वाघ लोखंडी सांपळा मोडून साखळदंड तोडून बाहेर सुटला, आहे यानें कित्येक लोकांना ठार करून आपल्या झपाट्यांत माझी सखी मदयंतिका इला धरल आहे.

(सर्व गडबडीनें जातात.)

**मालती**—हाय हाय! सखे, लवंगिके, मोठा कठीण प्रसंग आला बाई.

**माधव**—(पुढें येऊन) बुद्धरक्षिते; कोठें आहे तो वाघ—

**मालती**—(पाहून) काय माझे प्रियकरही येथेंच आहेत?

**माधव**-अहो आज माझ्या जन्माचें सार्थक झालें.

पद. चाल. टाकिन गरुडा ही.—

सुंदरिनें अवलोकुनिया ॥ वाटे मजला हृदयीं भरिलें नयना उघडुनिया ॥ धृ ॥ अथवा पंकज मालेचें ॥ केलें बंधन हें साचें ॥ किंवा मम सर्वांगा या ॥ सुख दिधलें तें प्रेमें वरती अमृता सिंचुनिया ॥ १ ॥

**बुद्धरक्षिता**—हे महाभागा, तो पहा वाघ, या बागेच्या बाहेर तोंडावरच आहे.

**कामंदकी**—मुलींनो; आतां भिऊ नका; वत्सा, फार सावधपणानें पराक्रम कर बरें.

**माधव**—(पाहून) अरेरे! या वाघानें तर निर्दयपणानें जिकडे तिकडे रक्ताचा व मांसाचा तर चिखल करून टाकिला आहे. याची मेघगर्जनेसारखी भयंकर आरोळी ऐकून सर्व लोक जिकडे वाट फुटेल तिकडे पळत सुटले आहेत. आतां याला धरावा तरी कसा?

(पडद्यांत.)

"अहो, हा पहा, काय चमत्कार झाला तो; हा दुष्ट वाघ मदयंतिकेला तोंडांत धरून भक्षण करणार तोंच या शूर मकरंदानें आपल्या तलवारीनें त्या वाघालाच ठार मारून मदयंतिकेला सोडवली."

**माधव**—शाबास मकरंदा शाबास!

**कामंदकी**—(पाहून) अरेरे! माझ्या मकरंदाला वाघानें पंजा मारून घायाळ केल्यामुळें तो मुर्छा पावून मदयंतिकेच्या मांडीवर डोकें ठेवून पडला आहे.

**माधव**—हायरे मित्रा, मकरंदा.

**कामंदकी**—वत्सा, असा घाबरां होऊं नकोस, चल आपण तिकडे जाऊन त्याला कोठें जखम लागली आहे ती पाहूं.

(सर्व मकरंदाजवळ जातात.)

**माधव**—हरहर! याला तर ही भयंकर मूर्च्छा आली आहे!

**मदयंतिका**—अहो, भगवति, या महाभागानें मजसाठीं आपला जीव संकटांत घातला तर याचें संरक्षण करा; हा दीनांचा दयाळु आहे.

**कामंदकी**—(दोघांवर कमंडलूतलें उदक शिंपडून) आतां तुह्मी यानां वारा घाला ह्मणजे ते सावध होतील.

(माळती माधवास व मदयंतिका मकरंदास वारा घाळतात.)

**मकरंद**—(सावध होऊन) मित्रा, माधवा, तूं इतका घाबरलास तो कां? मी तर सावध आहे.

**मदयंतिका**—(मनांत) अहाहा! मकरंद पूर्णचंद्र उदयाला आला!

**माधव**—अरे साहसिका मकरंदा, ये मला भेटकीरे!

**माळती**—(मनांत) अहाहा! मकरंद सावध होतांच माझा प्रियकरही सावध झाला.

**कामंदकी**—ईश्वरानें कृपा करून आज माझीं बाळें मला पुनः दिलीं.

**बुद्धरक्षिता**—सखे, मदयंतिके, तुजजवळ ज्याचें मी वर्णन केलें, तो मकरंद हाच बरें.

**मदयंतिका**—सखे, मी मघांच ओळखलें कीं, हा माधव आणि तो माझा प्रियकर म्हणून.

**बुद्धरक्षिता**—सखे, कां मी सांगितलें तसा तो आहे कीं नाहीं?

**मदयंतिका**—बुद्धरक्षिते, तूं माझी प्रियसखी असतां मजजवळ खोटें वर्णन करशील, असें कधीं तरी होईल काय?

(मकरंदाकडे उत्कंठापूर्वक पहाते.)

**मकरंद**—आज या मदयंतिकेनें मला कृतार्थ केलें—

साकी.

उचलुनि भुवया किंचित् गालीं हंसुनी सुंदरि मजला ॥ प्रेमे बघते; सा योगानें तोषचि चित्ता झाला ॥ जडली इजवरती ॥ याकालीं ही मत्प्रीती ॥ १ ॥

**कामंदकी**—(मनांत) आज मकरंद व मदयंतिका यांची नजरानजर होऊन एकमेकांविषयीं एकमेकांच्या मनांत प्रेम उद्भवलें हें फार चांगलें झालें. (उघड) वत्सा मकरंदा, आज मदयंतिकेचा प्राण वांचवण्याकरितां तुला दैवानेंच इकडे पाठवलें म्हणावयाचें.

**मकरंद**—भगवति, आज नगरांत मी एक दुर्वार्ता ऐकली; तीवरून मला वाटलें कीं, आज माधवाला फार त्रास झाला असेल; म्हणून अवलोकितेनें सांगितल्यावरून त्याला भेटण्याकरितां मी इकडे येत होतों; इतक्यांत ही कुलीन स्त्री वाघानें धरलेली मी पाहिली.

**कामंदकी**—(मनांत) ती दुर्वार्ता मालती माधवावांचून दुसऱ्याला देण्याची ही असेल. असो. (उघड)

वत्सा, माधवा, आज तुला मित्र लाभ झाला ही मोठी आनंदाची गोष्ट झाली. तर त्याबद्दल या वेळीं तूं मालतीला कांहीं तरी बक्षीस दिलें पाहिजेस.

**माधव**—भगवति, दुसरें बक्षीस कशाला देऊं.—

पद. चाल. अर्जुन तर संन्यासीही।—

**मन्मित्राला प्रहार केला असतां व्याघ्रानें ॥**
**मूर्च्छा आली मज ती नेली विलया सुंदरिनें ॥**
**उपकृति तैसी मजवरि केली हस्तस्पर्शानें ॥**
**तिस साकरितां मनजीवितहीं देतो सन्मानें ॥१॥**

**लवंगिका**—या बक्षिसाचा माझ्या सखीनें मोठ्या आदरानें स्वीकार केला, हें तिच्या तर्फेनें मी सांगतें.

**मालती**—(मनांत) मकरंदानें कोणती बरें दुर्वार्ता ऐकली ?

**माधव**—मित्रा, मकरंदा मला दुःख देणारी अशी कोणती बरें तूं नगरांत दुर्वार्ता ऐकलीस?

( पडद्यांत )

‘ वत्से, मदयंतिके, तुझा जेष्ट बंधु जो अमात्यनंदन त्याला आज राजानें मालती मोठ्या मेहेरबानीनें दिली आहे; तर विवाहसमारंभ करण्याकरितां तूं लौकर घरीं ये.’

**मकरंद**—मित्रा, माधवा, हीचती दुर्वार्ता.

( हें ऐकून मालती व माधव दुःखित होतात.)

**मालती**—हायहाय !

पद. चाल. मर्यादा सोडुनिही—

**ऐकिलि मी कशि ही वार्ता ॥ दुःखद जी झाली चित्ता ॥ तातानें मानिं निर्दयता ॥ खरि धरिली मजवरि आतां ॥ चाल ॥ अनाथ मी आजचि झाले ॥ मज तिळही सुख नच उरलें ॥ चरित्र सा विधिचें कळलें ॥ आशा ती निष्फळ होतां ॥ १ ॥**

मदयंतिका—सखे मालती, आपण बालपणापासून एकत्र खेळत आलों असल्यामुळें आजपर्यंत तूं माझी मैत्रीण होतीस; पण आतां तर आमच्या घरांत केवळ लक्ष्मीच झालीस.

कामंदकी—वत्से, मदयंतिके, तुझ्या भावाला मालती मिळाली; यावरून आजचा दिवस मोठा आनंदाचा आहे.

मदयंतिका—भगवति, हें सर्व तुमच्या आशिर्वादाचेंच फल आहे. सखे, बुद्धरक्षिते, चल आतां आपण लग्नाची तयारी करण्याकरितां जाऊं.

बुद्धरक्षिता—चल. (उठतात मदयंतिका मकरंदाकडे बघते.)

मदयंतिका—सखे, या कमलनेत्र मकरंदाचें पुनः मला दर्शन होईल कां ?

बुद्धरक्षिता—जर दैव अनुकूल असलें तर होईल.

मदयंतिका—बरें चल आतां. (जातात.)

माधव—(दुःखानें.)

पद. चाल. मजवरि हें आलें संकटही—

**आशातंतूचा ॥ शेवट केला ॥ दुर्दैवें साचा ॥ दुःसह शरिरीं होइल आतां वियोग मजला त्या सुंदरिचा ॥ धृ० ॥**

अथवा, जें झालें तें बरोबर झालें ; कारण—

**दुर्लभ ती मजला ॥ असुनीया ॥ केवळ प्रेमाला ॥ भुललों जो मी परिणामाचि हा घडुनी आला मजवरि त्याचा ॥ १ ॥**

**कामंदकी**—(मनांत) मालती दुसऱ्याला दिलेली ऐकून माझ्या माधवाला फार दुःख झालें; यांत संशय नाहीं ; असो. ( उघड ) बाळा, माधवा, भूरिवसूच आपण होऊन मला मालती देईल; असें तुला कधीं वाटलें होतें कां ?

**माधव**—भगवति, असें मला कधिं वाटलें नाहीं ; व मी तशी कधीं आशाही केली नाहीं.

**कामंदकी**—तर मग, पहिल्यापेक्षां निराश होण्यासारखें यावेळीं अधिक काय झालें आहे बरें ?

**मकरंद**—भगवति, मालतीचा वाङ्निश्चय झाला म्हणून माधवाला फार भय वाटत आहे.

**कामंदकी**—माधवा, हें तूं ऐकलें आहेस ना कीं ज्यावेळीं राजानें नंदनासाठीं भूरिवसूजवळ मालतीला मागणी घातली ; त्यावेळीं त्यानें ‘ तुम्ही आपल्या कन्येचें वाटेल तें करण्याला समर्थ आहां ’ असें त्याला उत्तर दिलें.

मकरंद—होय भगवति, हें आम्ही ऐकलें आहे.

कामंदकी—झालें, तर मग इतकें दुःख करण्याचें काय कारण आहे; कारण, आज राजानें नंदनाला मालती दिली, असें जें आपणाला समजलें तें कांहीं खरें नाहीं; भूरिवसूच्या वाक्याचा अर्थ तुम्ही आपल्या कन्येचें वाटेल तें करण्याला समर्थ आहां म्हणजे तुम्ही तुमची कन्या नंदनाला देण्याला समर्थ आहां, असा होतो; तर मालती कांहीं राजकन्या नाहीं; व तिचें दान करण्याचाही त्याला अधिकार नाहीं; हें नीट लक्षांत आण; म्हणजे तुला निराश होतां येणार नाहीं. बाळा, माधवा, मी हयगय करतें असें तुला वाटतें कां—

साकी.

लाभावी ही मालति तुजला म्हणुनी किती मी झटते ॥ जरि यतिवेषा धरिले करिते विपरित आचरणाते ॥ विवाह दोघांचा ॥ करण्या केला पणसाचा ॥ १ ॥

मकरंद—भगवति, तुम्ही आम्हांवर किती लोभ करितां हें सांगावयाला कां पाहिजे !

( पडद्यांत )

' अहो, भगवति, राणीसाहेब आपणाला अशी विनंति करीत आहेत कीं, आपण मालतीला घेऊन लग्नाकरितां लौकर यावें.

लवंगिका—हायहाय ! अमात्यानें माझ्या सखीचा कसा गळा कापला !

कामंदकी—वत्सा, माधवा, मकरंदा, तुम्हीं आतां घरीं जा. वत्से, मालती, चल मजबरोबर.

(उठतात)

माधव—आतां या माधवाला संसारांत मालतीशी सहवास काय तो इतकाच-शिवशिव कसें झालें हो हें!—

दिंडी.

आजवरी जें अनुकूल मला होतें ॥
फार झटलें कीं कराया हितातें ॥
दैव प्रतिकुल तें आज कसें झालें ॥
दुःखसागरिं मज तयें लोटियेलें ॥ १ ॥

मालती—हे नेत्रानंददायका, तुझी माझी हीच शेवटची भेट—

पद. चाल बघति वाट नटुनि ही—

कधिंही पुनरपि मी पाहिन नच वदना या ॥
विरहें जिव आतां जाइल मज सोडुनिया ॥
दैवें ठेवियलें निज मनिं जें योजुनिया ॥ आलें
दुःखद तें शेवटिं मज घडुनीया ॥ १ ॥

(कामंदकी लवंगिका व मालती जातात.)

माधव—हरहर! मी जन्माला येऊन सर्व प्रकारें दुःखी झालों. भगवतीचा मजवर लोभ आहे, ह्मणून ती माझें समाधान मात्र करिते; दुसरें कांहीं नाहीं;

आतां पुढें काय बरें करावें ? ( विचार करून ) आतां नरमांसविक्रय करण्यावांचून मला दुसरा उपाय दिसत नाहीं ; तर स्मशानांत जाऊन तसेंच करावें. ( उघड ) मित्रा, मकरंदा, तुला मदयंतिकेची उत्कंठा लागली वाटते ?

**मकरंद**—मित्रा, तुला काय सांगू ? माझें मन तिजकडे पूर्ण गुंतून जाऊन मवां झालेल्याची वारंवार आठवण होते—

## साकी.

व्याघ्रानें मज प्रहार करितां घाबरि जी होवोनी ॥
पदर जरीं तो सुटुनी गेला तरि नच या सांवरुनी॥
आलिंगन माते ॥ उघड्या अंगें देई तें ॥ १ ॥

**माधव**—तिचें मन तुजकडे वळवण्याकरितां निरंतर बुद्धरक्षिता प्रयत्न करीत आहे ; व आज तूं तिला वाघाच्या झपाट्यांतून सोडवून प्राणदान दिलें आहेस ; तेव्हां ती तुला सोडून दुसऱ्याला वरील असें मला वाटत नाहीं.

**मकरंद**—मित्रा, चल आतां, आज शिवरात्र आहे तर या शिवालयासमोर जो हा महानद्यांचा संगम झालेला दिसत आहे ; त्यांत स्नानें करून नंतर नगरांत जाऊं.

**माधव**—ठीक आहे चल तर. (जाऊन) मित्रा, या संगमावर पहा काय मौज दिसत आहे ती—

पद. चाल. नोहे नारी ही चंचल ही—

केला संगम हा अंगें घुवुनी ॥ पवित्र नारीं-
नीं ॥ कळशासम जे कुच सावरती स्वस्तिक
करिती या हस्तांनीं ॥ धृ० ॥ सांचीं वस्त्रें वा
जाती भिजुनी ॥ दिसतीं हीं म्हणुनी ॥ रम्यांगें
जीं बघतां मन हें जातें आनंदित होवोनी ॥ १ ॥

( असे म्हटल्यावर सर्व जातात. )

अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

(तदनंतर विमानस्थ कपालकुंडला प्र. क.)

कपालकुंडला—

श्लोक.

षडधिकदशनाडी चक्रमध्यस्थितात्मा ॥
हृदिविनिहितरूपः सिद्धिदस्तद्विदांयः॥
अविचलितमनोभिः साधकैर्मृग्यमाणः ॥
सजयतिपरिणद्धः शक्तिभिः शक्तिनाथः ॥

श्लोक.

नित्यंन्यस्तषडंगचक्रनिहितं हृत्पद्ममध्योदितम् ॥
पश्यन्ती शिवरूपिणंलयवशादात्मानमभ्यागता ॥
नाडीनामुदयक्रमेणजगतः पंचामृताकर्षणा- ॥
दप्राप्तोत्पतनश्रमाविघटयन्त्यग्रेनभोम्भोमुचः ॥

माझा गुरू अघोरघंट यानें कराला देवीला बली देण्याकारितां या स्मशानांत एक सुंदर अविवाहित स्त्री आणण्याविषयीं मला आज्ञा केली आहे, व ती स्त्री यांच नगरांत आहे; तर आतां तिचा लौकर शोधकरून तिला येथें आणलें पाहिजे; (पुढें पाहून) अहो, ज्याचें मुख कमलासारखें सुंदर असून सांप्रत मलीन झाले आहे; व ज्यानें हातांत नरमांस घेतलें

आहे; असा हा भव्य पुरूष कोणबरें इकडे येत आहे; हं समजलें; हा कामंदकीच्या मित्राचा पुत्र नरमांस विक्रय करणारा माधव आहे; असो, मला याच्याशीं काय करावयाचें आहे; मी आपल्या कामाला जाते; (असें ह्मणून जाते.) हा विष्कंभक झाला.

प्रवेश १ ला.

(तदनंतर वर्णन केल्याप्रमाणें माधव प्र० क०)

माधव—

पद. चाल. तापावि उत्कंठा मजसी ही—

लागुनि उत्कंठा ऐसी ॥ करितों मनिं मी मनोरथासी ॥ धृ० ॥ बकूलमालें गंधित कुचतट लावुनि सखि या अंगासी ॥ सुखविल कधि ती आलिंगुनि मज भिडवुनि गालाचि गालासी ॥ १ ॥ दर्श्नि ज्याच्या उत्सव नयना घडुनि रति ये चित्तासी ॥ चंद्रकलारस यानें घडिले जें मुख पाहिन कधि त्यासी ॥ २ ॥

अथवा, तिला पाहून आणखी विशेष ते काय होणार आहे; कारण, तिचें निरंतर चिंतन केल्यामुळें माझे अंतःकरण अगदीं तन्मय होऊन गेलें आहे; पहा—

साकी.

मम चित्तीं ती मिळूनी गेली प्रतिबिंबींतही झाली ॥ वाटे मदनें पांचाबाणीं खिळिली कीं

# अंक तिसरा.

(तदनंतर विमानस्थ कपालकुंडला प्र. क.)

कपालकुंडला—

श्लोक.

षडाधिकदशनाडी चक्रमध्यस्थितात्मा ॥
हृदिविनिहितरूपः सिद्धिदस्तद्विदांयः॥
अविचलितमनोभिः साधकैर्मृग्यमाणः ॥
सजयतिपरिणद्धः शक्तिभिः शक्तिनाथः ॥

श्लोक.

नित्यंन्यस्तषडंगचक्रनिहितं हृत्पद्ममध्योदितम् ॥
पश्यन्ती शिवरूपिणंलयवशादात्मानमभ्यागता ॥
नाडीनामुदयक्रमेणजगतः पंचामृताकर्षणा- ॥
दप्राप्तोत्पतनश्रमाविघटयन्त्यग्रेनभोम्भोमुचः ॥

माझा गुरू अघोरघंट यानें कराला देवीला बली देण्याकारितां या स्मशानांत एक सुंदर अविवाहित स्त्री आणण्याविषयीं मला आज्ञा केली आहे, व ती स्त्री यांच नगरांत आहे; तर आतां तिचा लौकर शोधकरून तिला येथें आणलें पाहिजे; (पुढें पाहून) अहो, ज्याचें मुख कमलासारखें सुंदर असून सांप्रत मलीन झाले आहे; व ज्यानें हातांत नरमांस घेतलें

आहे; असा हा भव्य पुरूष कोणबरें इकडे येत आहे; हं समजलें; हा कामंदकीच्या मित्राचा पुत्र नरमांस विक्रय करणारा माधव आहे; असो, मला याच्याशीं काय करावयाचें आहे; मी आपल्या कामाला जाते; (असें ह्मणून जाते.) हा विष्कंभक झाला.

प्रवेश १ ला.

( तदनंतर वर्णन केल्याप्रमाणें माधव प्र० क० )

माधव—

पद. चाल. तापवि उत्कंठा मजसी ही—

लागुनि उत्कंठा ऐसी ॥ करितों मनिं मी मनोरथासी ॥ धृ० ॥ वकूलमालें गंधित कुचतट लावुनि सखि या अंगासी ॥ सुखविल कधि ती आलिंगुनि मज भिडवुनि गालचि गालासी ॥ १ ॥ दर्शनिं ज्याच्या उत्सव नयना घडुनि रति ये चित्तासी ॥ चंद्रकलारस यानें घडिले जें मुख पाहिन कधि त्यासी ॥ २ ॥

अथवा, तिला पाहून आणखी विशेष ते काय होणार आहे ; कारण, तिचें निरंतर चिंतन केल्यामुळें माझे अंतःकरण अगदीं तन्मय होऊन गेलें आहे; पहा—

साकी.

मम चित्तीं ती मिळूनी गेली प्रतिबिंबीतही झाली ॥ वाटे मदनें पांचाबाणीं खिळिली कीं

खोदियली ॥ अथवा गुंतविली ॥ या चितावंतू-
जाळीं ॥ १ ॥

(पडद्यांत गलबला होतो.)

अहो, सांप्रत जिकडें तिकडें भुतें उठल्यामुळें हें स्मशान कितीतरी भयंकर दिसत आहे—

ओंव्या.

जेणें व्यापियलें दिगंतर ॥ पडुनी ऐसा अंधकार ॥ तेणें खचलें सर्व अंबर ॥ कांहीं येथें दिसेना ॥ १ ॥ या अंधकारीं चिताज्वाळा ॥ लकलकती अति चंचला ॥ सर्व भूतें पिटोनि टाळ्या ॥ हिंडति सासभोंवतीं ॥ २ ॥

असो; आतां या सर्व भुतानां मी मांस घेण्याकरितां हाक मारतों; अहो, सर्व पिशाचहो, शस्त्रानें न काढलेलें असें हें मनुष्यांचें मांस मी विकतों आहे; तर लौकर येऊन घ्या. अहो, हा काय चमत्कार! मी हाक मारतांच जिकडेंतिकडें आरोळी मारीत हीं सर्व भूतें उठलीं; यांचीं शरीरें तेजहीन असल्यामुळें अति भयंकर दिसत आहेत! (कांहीं चालून) अरेरे! येथें कितीतरी घाण आहे. याठिकाणीं जी ही नदी वहाते तिच्या तीरावर मनुष्यांच्या हाडांचे व कवट्यांचें सारखे डोंगर पडले आहेत, व त्याठिकाणीं लांडगे गर्जना करीत आहेत; आणि तशीच येथें ही एक मौजच दिसत आहे.—

ओंव्या.

हृत्कमलांच्या घालुनी माला ॥ शोणितकुंकुम लावुनी भाळां ॥ आतड्यांचीं सापरी गळां ॥ मंगळसूत्रें घालुनी ॥ १ ॥ करुनी ऐशी शृंगाररचना ॥ आनंदें नाचती पिशाचांगना ॥ पतीसह करिती मदमद्यपाना॥ करोनि पेले करव्यांच ॥२॥

अहो, भुतांच्या चेष्टा मात्र भयंकर आहेत; पण त्यानां धैर्य व बल हीं अगदीं नाहींत; मला बघतांच सर्व भिऊन पळून गेलीं; असो, आतां दुसरा एखादा चमत्कार पाहूं.

(पडद्यांत.)

'हायहाय! हा ताता! हे आई, तूं कोठें आहेस?'

माधव—(ऐकून) अरे, या ठिकाणीं कोण शोक करतें आहे बरें—

साकी.

पीडा पावुनि व्याकुल हरिणी दुःखें जशि ओरडती ॥ परिचित तैसे करुणारव हे माझ्या कानीं पडती॥ लागति बहु ठेंचा ॥ प्रसंग दिसतो दुःखाचा ॥ १ ॥

काय असेल ते असो; ही हाक करालादेवीच्या देवळांतून येत आहे; तर आतां तिकडेंच जाऊन पहावें काय आहे तें—(देवळांत जातो) (तदनंतर पूजेच्या

साहित्यासह अघोरघंट व कपालकुंडला बळी देण्याच्या चिन्हांनीं सजविलेली मालती घेऊन प्र० क०)

मालती—

पद. चाल. उभी जवळ खरी ही—

हायहाय ताता जननी तुह्मां मी आजचि मुकलें ॥
लवांगिके सखये तुजला रडवाया कारण झालें ॥
भगवतिच्या चरणा पासुनि ॥ दैवें ओढुनि ॥
मज आणियलें ॥ दुष्टांच्या हातीं दिधलें ॥ १ ॥

अघोरघंट—कपालकुंडला—(देवीची स्तुति करितात) हे देवी, चामुंडे, तुला नमस्कार असो—

श्लोक.

सावष्टंभनिशुंभनिर्भरनमद्भूगोलनिष्पीडन—॥
न्यंचत्कर्परकूर्मकम्पविगलत्ब्रह्मांडखंडस्थिति ॥
पातालप्रतिमल्लगल्लविवरप्रक्षिप्तसप्तार्णवम् ॥
वंदेनंदितनीलकंठपरिषत्व्यक्तार्द्धिवःक्रीडितम् ॥

श्लोक.

प्रचलितकरिकृत्तिपर्यंतचंचन्नखाघातभिन्नेंदुनिस्यंदमानामृतश्चोतजीवत्कपालावलीमुक्तचंडाट्टहासत्रसत्भूभारिभूतप्रवृत्तस्तुति ॥

श्वसदासितभुजंगभोगांगदग्रन्थिनिष्पीडनस्फारफुल्लत्फणापीठनिर्यद्विषज्योतिरुज्जृंभणोडामरव्यस्तविस्तारिदोःखंडपर्यासितक्ष्माधरन् ॥

ज्वलदलनपिशंगनेत्रछटाछन्नभीमोत्तमांग्रभ्रमिप्रस्तुतालाचचक्रक्रियास्यूतदिग्भागमुत्तंगखट्वांगकोटिध्वजोत्भूतिविक्षिप्ततारागणम् ॥

प्रमुदितकटपूतनोतालवेतालतालस्फुटत्कर्णसंभ्रांतगोरीघनाश्लेषहृष्यन्मनम्त्र्यंबकानांदिवस्तांडवंदेविभूयादभिष्टयैचहृष्टयैचनः ॥

(पूजा करून देवीच्या पायावर मालतीला घालतात.)

माधव—शिवशिव! काय हा अनर्थ!

दिंडी.

नीच कीं हो ही भूरिवसूबाला ॥ हिला घालोनी त्या स्मशानमाला ॥ तसें रक्तांबर तिला नेसवोनी ॥ बली द्याया आणिले असे यांनीं ॥ १ ॥

असो; या सुंदरीच्या सुदैवानें आज मी येथें आलों हें फार चांगलें झालें; आतां हा नीच तिला मारण्याच्या अगोदरच मी पुढें होऊन तिचें संरक्षण करितो.

कपालकुंडला—वत्से, मालती, या ठिकाणीं आह्मी तुझा वध करण्याकरितां तुला आणली आहे; तर अंतकालीं तुला कोणाचें चिंतन करणें असेल तर कर.—

मालती—हायहाय! हे प्राणप्रिया, माधवा, तुला माझा शेवटचा नमस्कार असो.

कपालकुंडला—अरेरे! या बिचारीचें मन माधवावर गेलें आहे.

अघोरघंट—तें कांहीं असो; आतां हिला मी ठार मारतो. ( तो मारणार तोंच माधव पुढें येऊन. )

माधव—दुष्टा, सोडतोस कां नाहीं या सुंदरीला.

मालती—( त्याला मिठी मारून ) महा समर्थ माधव माझें रक्षण करो.

माधव—सुंदरी भिऊं नकोस.

साकी.

तव निधनाच्या समयीं सखये दाखविण्या मैत्री गे॥
सोडुनि भय मी येथें आलों तुज रक्षाया मार्गें ॥
भीशी कां ऐसी ॥ पाठविते या नरकासी ॥ १ ॥

अघोरघंट—अरे, कोणरे हा पापी आमच्या कार्याचा भंग करावयाला येथें आला ?

कपालकुंडला—महाराज, या मालतीचा प्रियकर जो नरमांसविक्रय करणारा माधव तोच हा.

माधव—सुंदरी, तूं येथें कशी आलीस ?

मालती—महाराज, मी महालांत निजलें होतें इतकेंच काय ते मला आठवते; तेथून या दुष्टांनीं मला येथें केव्हां आणलें हें कांहीं माहीत नाहीं; आपण कोठून येथें आलां ?

माधव—सुंदरी, तूं विचारतेस त्यापेक्षां मला सांगणें भाग आहे—

पद. चाल. मितीस पात्र कोणही—

हा कृतार्थ जनु करण्या तुज वरोनि गे ॥ बहु

शिणलों परि झालों मी निराश गे ॥ मर्त्यांचें मग विकतां मांस आज गे ॥ अवचित हा ऐकियला तव विलाप गे ॥ १ ॥

मालती—हायहाय! मजसाठीं आपण जिवावर देखील उदार झाला नां?

माधव—अहो, काय हा चमत्कार.

पद. चाल. अबला स्त्री ही केवळ ही.—

राहूमुखिची चंद्रकला ती दैवें करिं आली ॥
खड्गा पासुनि या चोराच्या शौर्यें रक्षियली ॥
ती कारुण्यें द्रवते तैसी भीतीनें घाबरते ॥ आश्चर्यानें भ्रमते ह्मणुनी मन विकास पावें तें ॥ १॥

अघोरघंट—अरे ब्राह्मणाच्या पोरा, वाघ हरीणीचा नाश करीत असतां जसा हरीण तिला सोडवावयाला येतो; तसा, तूं येथें आला आहेस; तर इच्या अगोदर तुलाच मारून मी या भूतजननीला प्रसन्न करितो.

कपालकुंडला—भगवान् हा फार हुशार आहे तर याला मोठ्या खबरदारीनें मारा.

मालती—महाराज, हा अधम मोठा घातकी आहे; तर मजसाठीं आपण या संकटांत पडूं नका.

माधव—अगे मित्रे, अशी घाबरतीस कां?

साकी.

हस्तींद्राचें गंडस्थल तें भेदी जो लीलेनें ॥
त्या सिंहाला दुर्घट नाहीं हरिणाचा वध करणें ॥
धरि गे मनि धैर्या ॥ वधितो वध मी दुष्टा या ॥ १॥

( अघोरघंटास ) अरे नीचा, पाखंडा, चांडाळा

पद. चाल. लहान वस्तुती ही—

शिरीषकुसुमें ताडन तें ॥ होई दुःसह कीं जीते ॥ वधुनी त्या सुकुमारीते ॥ कां संसारा असार करिसी निर्भूषण जगतें ॥ किंवा अदर्प मदनाते ॥ करण्या इच्छिसि तरि वधितो मी भुजवीर्यें तूतें ॥ १ ॥

( त्याला ठार मारतो. )

कपालकुंडला—अरे, दुष्टा, माधवा, मालतीकरितां माझ्या समक्ष माझ्या गुरूचा वध केलास काय? बरें कांहीं चिंता नाहीं; तुला लौकरच या कपालकुंडलेच्या रागाचें फळ भोगावें लागेल.

( रागानें जाते. )

( पडद्यांत. )

"अहो, मालतीचा शोध करणारे लोक हो, कराला देवीला बली देण्याकरितां अघोरघटानें मालती नेली आहे; तर लौकर त्याला वेढा घालावा अशी तुह्मांला भगवति कामंदकीची आज्ञा आहे."

**माधव**—शिवशिव! आतां हीं मालती मला सोडून जाणार ना! असो. हिला हिच्या बधुंजनांच्या हवाली करून मग आपणाला जें सुचेल ते करावें. (मालतीस) सुंदरी, जा तूं आतां आपल्या बांधवा बरोबर—

**मालती**—(त्याच्या गळ्याला मिठि मारून) प्राणप्रिया.

पद. चाल. शराग्रमदनाचे हृदयासीही

आपण रक्षियले जरि मजला ॥ तरि विसरुनि त्या कृतज्ञतेला ॥ जाते सोडुनि या चरणाला ॥ सखया पापिण मी ॥ १ ॥ मद्वियोग दे सुख नच चित्तीं ॥ तरि दुष्कर्मे टाकुनि द्या तीं ॥ आणुनि माझी मनिं ही विनती ॥ सखया घरिं राहा ॥ २ ॥

(सर्व जातात.)

**प्रवेश १ ला समाप्त.**

---

# प्रवेश २ रा.

(तदनंतर कलहंसक प्र. क.)

**कलहंसक**—भगवति, कामंदकीच्या आज्ञेवरून माझा धनि माधव आपल्या मित्रासह देवीच्या देवळांत जाऊन बसला आहे; व मालती देवीचे दर्शनासाठीं येण्याला निघाली ह्मणजे सूचना करण्याविषयीं त्यानें मला आज्ञा केली आहे; तर आतां

मी लौकर जाऊन, त्याला मालती देवीचे दर्शनाला निघाली हें आनंदाचें वर्तमान कळवतों. (कांहीं चालून) हा पहा माझा धनि आपल्या मित्रासह इकडेच येत आहे.

(तदनंतर मकरंदासह माधव प्र० क०)

माधव—मित्रा, अजून कां बरें मालती देवीच्या दर्शनाला आली नाहीं ?

मकरंद—तिजविषयीं तूं इतकी काळजी कां करतोस ? हे पहा, भगवतीची मसलत कधींही फसावयाची नाहीं.

कलहंसक—महाराज, आपलें दैव फार थोर.! मालती, देवीचें दर्शन घेण्याकरितां येण्याला निघाली.

माधव--कलहंसका, खरेंच कारे मालती इकडे येण्याला निघाली?

कलहंसक--महाराज, निघाली इतकेंच नाहीं; तर अगदीं देवळाजवळ आली; हा पहा, मेघगर्जनेप्रमाणें वाद्यांचा कडकडाट ऐकूं येत आहे; तशाच तिजबरोबर दुसऱ्या पुष्कळ स्त्रिया अंगावर अनेक प्रकारचें रत्नांचे अलंकार घालून गाणीं ह्मणत इकडेच येत आहेत.

मकरंद--मित्रा, माधवा, अमात्य भूरिवसूचें वैभव अद्भुत आहे; यांत संशय नाहीं; या समारंभांत इंद्रनील मणी, पांचू, माणके, यांचा जो विचित्र किरणसमुदाय पडला आहे; तेणेंकरून मला तर

इंद्रधनुष्याचाच भास होतो; अरे ही पहा मालती, शेंद्रानें सोंडेवर रंगवलेल्या व नक्षत्रमाळांनीं सुशोभित केलेल्या काळ्या हत्तिणीवर बसून इकडेंच येत आहे–यावेळीं—

साकी.

कुसुमित वेली सम बहु भूषणमंडित ही होउनिया
प्रेक्षकमानस आकर्षित ये दिसते किति रमणीया
परितें अंतरिचें ॥ दुःखचि दावी मुख साचें ॥ १ ॥

माधव—अरे, ही मालती हत्तिणीवरून खालीं उतरून भगवति व लवंगिका, यासह इकडेंच येत आहे.

(तदनंतर कामंदकी, लवंगिका व मालती प्र० क०)

मालती—( मनांत )

पद. चाल. असतानां यति ही—

जिव जाउनि कुदशा ही जाइल कधिं विलयाला ॥
उपाय तो मरणाचा नसुचे कांहीं मजला ॥
दुर्दैवी असती जे जन ते मरणा मनिं वांछीती ॥
परि नच साना तें येउनियां नच संपति दुःखें तीं ॥
वाटे यमधर्माला ॥ भय तें इस नेण्याला ॥ १ ॥

लवंगिका—हायहाय! ही माझी सखी त्या माधवाच्या वियोगदुःखानें फारच गांजून गेली आहे!

( द्वारपालिका प्र० क० )

द्वारपालिका—भगवति, अमात्यानें आपणाला

अशी विनंति केली आहे कीं, हे राजानें मालती-करितां दागिने पाठविले आहेत ते देवीच्या समोर मालतीच्या अंगावर घालावेत.

**कामंदकी**—अमात्यानें चांगले सांगितले, हें मांगलीक स्थल आहे; तेव्हां अंगावर दागिने येथेंच घातले पाहिजेत. कायकाय दागिने आहेत ते मला दाखीव पाहूं.

**द्वारपालिका**—( पेटी उघडून ) हे पहावे ; ही जरीकाठी चोळी, ही लफ्याचा साडी ; ही भरगच्ची फडकी ; हा मोत्यांचा कंठा, हा चंद्रहार, ही बिंदी ; हें कुंकू व चंदन.

**कामंदकी**—( मनांत ) हे दागिने मकरंदाला मालतीचा वेष देतानां फार उपयोगी पडतील ; ( उघड ) आण ते. आणि अमात्याला सांग कीं, आपण सांगितल्याप्रमाणें आह्मी करतो ह्मणून.

**द्वारपालिका**—आज्ञा. ( असें ह्मणून जाते. )

**कामंदकी**—वत्से, लवंगिके तूं आतां मालतीला घेऊन देवीची पूजा करण्याकरितां आंत जा.

**लवंगिका**—भगवति, आपण कोणीकडे जातां ?

**कामंदकी**—मी एकांतीं बसून अलंकारांच्या रत्नांची परिक्षा करिते.

( दोघी आंत जातात. )

**मकरंद**—मित्रा, आपण येथें या खांबाआड उभे राहूं.

**माधव**—ठीक आहे. (तसें करितात.)

**लवंगिका**—सखे, हें देवीला उटी लावण्याला केशरी गंध आणि या फुलांच्या माला!

**मालती**—कशाला ते गंध आणि कशाला त्या माळा!

**लवंगिका**—सखे, तुझ्या कल्याणासाठीं लग्नाच्या अगोदर देवीची पूजा करण्याकरितां तुला मातेनें पाठवलें आहे; तर आतां मी पूजा सांगतें त्याप्रमाणें कर.

**मालती**—अगे, माझें दैव फुटल्यानें अगोदरच माझें अंतःकरण दुःखानें पोळून गेलें आहे. तशांत मर्मभेदक भाषणांनी त्यावर डाग कां देतेस? सखे—

**लवंगिका**—सखे, तुझ्या मनांतून आणखी कांहीं बोलावयाचें आहे; तर बोल थांबलीस कां?

**मालती**—सखे, एखाद्यानें दुर्लभ वस्तूवर मन ठेवून त्याचा आशाभंग झाला असतां तो जें कांहीं बोलतो; तच मला बोलावयाचें आहे.

**मकरंद**—मित्रा, माधवा, ऐकलेंस ना?

**माधव**—होय ऐकलें; पण अजून मनाला समाधान वाटत नाहीं.

**मालती**—सखे, लवंगिके, तूं माझी प्रियसखी असून धर्मभागिनी आहेस; व तुझें मजवर फार प्रेम

आहे; मी सांप्रत अनाथ असून जीव देण्याला तयार झालें आहे; तर आतां तुला मी शेवटची इतकीच विनंती करते कीं; तूं माझी मूर्ती मनांत आणून एक वेळ त्या माधवाचें आनंदभरीत मुखकमल पहा; ह्मणजे तुझे मजवर फार उपकार होतील.

माधव—मित्रा मकरंदा—

साकी.

विकासणाऱ्या सुकलेल्या या जिवरूपीं कुसुमानां ॥ इंद्रियवर्गा सुखवीणाऱ्या सुंदरिच्या वचनानां ॥ ऐकुनि या कालीं ॥ झालों बघ मी जयशाली ॥ १ ॥

मालती—सखे, लवंगिके, तुझ्या सखीचें तुला आणखी एक शेवटचें सांगणें आहे—

पद. चाल. बाई तूं या आम्रतरूसी ही.

मुखिकालाच्या पडतां मी गे ॥ रक्षी जो मज येउनिमागे ॥ दुःखचि होईल त्या पुरुषाते ॥ जातां ही मी परलोकाते ॥१॥ चिंतन माझें तो करुनीया जाईल सोडुनि संसारा या ॥ तरि तूं त्याचें मन वळवोनी ॥ राहिल ऐसा करि गे सदनीं ॥ २ ॥

मकरंद—किती तरी हे विलक्षण प्रेम !

माधव—मित्रा,

पद. रुतला दर्भांकुर ही—

गेला आशांकुर तुटुनी ॥ झाली दुःखित ही ह्मणुनी ॥ बघ दीनानन ते करुनी ॥ रडते कैसी मृगनयनी ॥ प्रकार ऐसा पाहुनि चिंता हृदयीं संभवुनी ॥ इच्छा होई सुख मिळवाया इजला भेटोनी ॥ १ ॥

**लवंगिका**—सखे, असें काय भलतेंच बोलतेंस? ईश्वर तुला पुष्कळ दिवस वांचवो; आतां नाहीं गडे तुझें मी अमंगळ भाषण ऐकत.

**मालती**—सखे, तुला मालतीचा जीव मात्र प्रिय आहे; मालती कांहीं प्रिय नाहीं.

**लवंगिका**—सखे, तूं काय ह्मणतेंस? तुझ्या बोलण्याचा अभिप्राय मला कळला नाहीं.

**मालती**—सखे, लवंगिके—

पद. चाल. असुनी सहवास सदत ही—

आशा जी आजवरी होति मन्मनीं ॥ ती गेली दुर्दैवें आज संपुनी ॥ तरि सखये गुण सांचे सर्व चिंतुनी ॥ वाटे सुख मिळवावे प्राण देउनी ॥ १ ॥

तर, जर तूं माझी प्रियसखी असशील तर या माझ्या मनोरथाला प्रतिकूल होऊं नकोस.

(तिच्या पाया पडते.)

**लवंगिका**—(माधवाला खुणेनें बोलावते.)

**मकरंद**—मित्रा जा लौकर, लवंगिकेच्या जागीं उभा रहा.

**माधव**—अरे, तिच्या जागीं उभे रहाण्याला मला भय वाटते.

**मकरंद**—अरे असा भितोस कां? ही तुझा मनोदय सफल होण्याची वेळ आहे. जा लौकर.

**माधव**—बरें तर जातो. (तसें करतों.)

**मालती**—सखे, मजवर दया कर आणि मला जीव देण्याला परवानगी दे.

**माधव**—सखे, मालती, असा भलताच काय बरें आग्रह करतेस? तुझें हें साहस पाहून मला फार वाईट वाटतें.

**मालती**—सखे, लवंगिके, मालती पायांपडून मागत असतां तिला परवाननी न देणें तुला योग्य नाहीं.

**माधव**—सखे, मालती—

### दिंडी.

काय सांगूं या तुझ्या वियोगाची ॥
फार होते वेदना मला साची ॥
हेतु पुरवी मम सखे एक वार ॥
उठुनि माझीया गळां मिठी मार ॥ १ ॥

**मालती**—सखे, तुझा मजवर मोठा उपकार झाला; तुझ्या इच्छेप्रमाणें तुला मी शेवटचें आलिंगन देते; कारण, या जन्मीं मला तुझें दर्शन पुनः कोठून

होणार ? (आलिंगन देऊन) सखे, तुझ्या सुकुमार शरीराचा आज कांहीं निराळाच भास होतो; व त्यापासून फार सुख होते; सखे, ही माझी मरणकाळची विनंती माझ्या प्राणप्रियाला आतां तूच सांग—

पद. चाल. पूर्वी तुझ्या अधरोष्टावरि ही–

**पाहुनि तुमच्या मुखकमलाते कृतार्थ नयना नच केलें ॥ चिंतन करितां अनिवारचि जें मन झाले तें आकळिलें ॥ वियोग असतां वसंतशशिच्या तापाते ही सोशियले ॥ परि आशा ती समूळ विलया जातां परलोका गेले ॥ १ ॥**

सखे, लवंगिके, तुला या गरीब मालतीची निरंतर आठवण असूं दे बरें; आणखी सखे, हा प्राणप्रियांनीं गुंफलेला बकुलपुष्पांचा हार मला माझ्या प्राणाहून प्रिय आहे; तो आतां मी तुझ्या हवालीं करते; याला निरंतर गळ्यांत बाळगीत जा; व जशी माझी काळजी वाहतेस; तशी याची ही वहात जा. (हार गळ्यांत घालून भिऊन मागें सरते.)

माधव—अहाहा, आज मी कृतार्थ झालों—

साकी.

**आलिंगन मज सुंदरि देतां सुख चित्ता बहु झाले ॥ वाटे चंदनकर्पुरखंडें मदंग भिजुनी गेले ॥ अथवा शैवालें ॥ माखुनि तीनें टाकियलें ॥ १ ॥**

मालती—( पाहून ) हायहाय! लवंगिकेनें मला फसवलें.

माधव—सखे, तूं आपलें दुःख मात्र लोकानां सांगतेंस, पण दुसऱ्याचें मुळींच जाणत नाहींस, हें काय बरें?

पद. परिणिलेन मुनि ही—

कामज्वर या देहाला ॥ आजवरी बहु जो झाला ॥ सुंदरी ॥ ध्यानीं कीं स्वप्नीं तुजला ॥ भेटुनिया तो घालविला ॥ सुंदरी ॥ मजवरि तूं सुप्रेमाला ॥ करिसी या विश्वासाला ॥ सुंदरी ॥ धरुनी सोसुनि दुःखाला ॥ सर्व काल मी लो-टियला ॥ सुंदरी ॥ १ ॥

लवंगिका—सखे, तुला त्यानें बरोबर बोल लावला.

मकरंद—हे महा भाग्यवती मालती—

साकी.

दयालु तूते समजुनि ज्यानें लोटियले का-लाते ॥ त्या मन्मित्रा कंकणमंडित देउनिया ह-स्ताते ॥ करि गे जयशाली ॥ दुःखें आतां नच उरलीं ॥ १ ॥

लवंगिका—हे महानुभावा, तिनें त्याच्या गळ्या-ला मिठी मारून आलिंगन सुख देखील अनुभविलें आहे; मग आतां तिला बाहेर कंकणमंडितकर देण्याचें काय कठीण आहे?

मालती—हरहर! लवंगिके, तूं अविवाहित कन्येला अनुचित अशी गोष्ट मला करावयाला सांगतेस, हें तुला शोभत नाहीं.

(इतक्यांत कामंदकी प्र० क०)

कामंदकी—मुलीं, तूं अशी घाबरल्यासारखी कां दिसतेस?

मालती—(भिऊन कामंदकीला मिठी मारते).

कामंदकी—

पद. चाल. या विरहा कां भीसीही—

धरिशी कां लज्जेते ॥ वेडे, योग्यन तूंते ॥ धृ० ॥ ज्याच्या दर्शनिं मोहुनि विरहे झुरलिस मिळशी साते ॥ १ ॥ सफलचि झाले मदनमनोरथ तैसें विधिकौशल तें ॥ २ ॥

लवंगिका—भगवति, काळोख्या रात्रीं स्मशानांत एकटा हिंडून घोर कर्मे करणारा तुमचा माधव पाहून माझी सखी घाबरली यांत विशेष काय झालें?

मकरंद—शाबास लवंगिके, तूं योग्य प्रसंगीं प्रेम आणि उपकार यांची सूचना केलीस. याचेंच नांव समयोचित भाषण!

कामंदकी—वत्सा, माधवा.-

माधव—काय आज्ञा भगवती?

कामंदकी—सर्व मांडलीक राजे ज्याला अभिवंदन करितात, अशा अमात्य भूरिवसूची ही एकुलती

एक कन्या मालती, समसमान गुणांचा संयोग करणारा ब्रह्मदेव, मदन, आणि मी असे तीघे मिळून तुला देत आहों, तर तुला माझी इतकीच विनंती आहे कीं—

पद. चाल. रतिपति दती म्हणती ही—

सत्पुरुषांची प्रीती जडते ॥ परिणामीं ती सुखकर होते ॥ धृ० ॥ जाणुनि मनि हें या मालतिला अंतर कधिंही नच देईं तें ॥ १ ॥

(त्याच्या पायां पडते.)

माधव—हें काय भगवति, आपला मजवर लोभ आहे; तरी पाया पडून आपण मला पापांत लोटूं नये. कारण—

पद. चाल. निष्कारण हंसता नाहीं—

लावण्याची खनिची केवळ सत्कुलिं जन्मा आली ॥ चातुर्याच्या कोशाची ही जणुं देवी संभवली ॥ तीचा एकचि गुणही पुरला असतां मी मोहाया ॥ दिलि आपण ती आतां उरलें नच कांहीं बोलाया ॥ १ ॥

कामंदकी—वत्सा, माधवा, वत्से, मालती—

मित्र बंधु कीं जीवित विधितो ॥ स्त्रिचा भर्ता तनये असतो ॥ स्त्री गणगोत्रचि असते पतिचें जाणे वत्सा मद्वचनातें ॥ १ ॥

मकरंद—लवंगिका–भगवति, आपण अगदीं खरें सांगितलें.

**कामंदकी**—वत्सा, मकरंदा, तूं आतां हे विवाहसंबंधी मालतीचे अलंकार अंगावर घालून आपला विवाह करून घे.

**मकरंद**—आज्ञा भगवति.

(असें म्हणून जातो.)

**माधव**—भगवति, माझ्या मित्रावर हे मोठें संकट आलें!

**कामंदकी**—वत्सा, तुला कां त्याची काळजी?

**माधव**—भगवतीची काळजी भगवतीलाच! मी कशाला करूं?

**कामंदकी**—वत्सा, माधवा, तूं मालतीसह या झाडांपलिकडे जो आमचा मठ आहे; तेथें अवलोकितेनें सर्व विवाहसाहित्य तयार करून ठेवलें आहे; तर तेथें जाऊन मकरंद आणि मदयंतिका विवाहविधि संपादनकरून येईपर्यंत त्यांची वाट पहात बैस.

**माधव**—कल्याणें एकदां होऊं लागलीं ह्मणजे उत्तरोत्तर तींच होऊं लागतात.

**कामंदकी**—वत्से, लवंगिके, चल आतां आपण जाऊं.

**मालती**—सखे, तूं देखील मला टाकून चाललीस ना?

**लवंगिका**—आतां मी उगीच दोघांत तिसरी कशाला पाहिजे.

(कामंदकी व लवंगिका जातात.)

माधव—सुंदरी—

पद. चाल. किती तरी पहाटचीही—

सरोवरी ॥ गज जैसा शुंडाग्रीं धरितो पंकज ते ॥ त्यापरि ज्या अंगुलिचीं ॥ पर्णें हीं बघ साचीं नालासम भुज तव हा शोभे कीं साते ॥ १ ॥ ऐशा तव करकमला ॥ होउनि वश मदनाला ॥ धरितो मी निजहस्तें याकालीं कांते ॥ २ ॥

(सर्व जातात.)

तिसरा अंक
समाप्त.

# अंक चवथा.

(तदनंतर बुद्धरक्षिता प्र० क०)

**बुद्धरक्षिता**—भगवति कामंदकीचे किती विलक्षण चातुर्य. तिच्या वचनावरून मकरंद मालतीचा वेष घेऊन अमात्य भूरिवसूच्या मंदिरांत गेला असतां त्याला मालतीच समजून नंदनानें त्याचे पाणिग्रहण केले; व सायंकाळीं ग्रहप्रवेष झाल्यानंतर अंतःपुरांत तो फारच कामातुर होऊन मालतीच्या भ्रांतीनें त्याच्याशी लाडीगोडी लावूं लागला; व ती चालेना तेव्हां बलात्कारही करण्याचा प्रसंग आणला; पण मकरंदानें रागवलेसे करून त्याला अशी कांहीं जोरानें एक लाथ मारली कीं, त्यामुळें त्याचा अगदीं हिरमोड होऊन तो रागाच्या आवेशांत त्याला 'तूं छिनाल आहेस मी तुझें मुखावलोकन करणार नाहीं.' असें बोलून निघून गेला. मग मी ही संधी साधून मदयंतिकेला तेथें घेऊन गेलें; व तिचें मकरंदावर पूर्ण प्रेम जडलेलें पाहून त्याची व तिची गांठ घालून दिली; नंतर लवंगिकेसमक्ष मकरंदनें तिचें पाणिग्रहण केल्यावर मी त्याना चोरवाटेनें ज्या टिकाणीं मालतीमाधव अवलोकितेसह बसलेले आहेत तिकडे लावून दिले. आतां मी हें वर्तमान भगवतीला जाऊन कळवते.

(असें ह्मणून जाते)

हा विष्कंभक झाला.

(तदनंतर मालती, माधव व अवलोकिता प्र० क०)

माधव—अहाहा; प्रिये मालती मदनाचा प्राढ मित्र जो मध्यरात्रसमय त्याची किती मौज वाटत आहे.—

## दिंडी.

**उदय नाहीं पावला चंद्र जों तों ॥ मातलेला हा अंधकार जातो ॥ ल्या सखये तत्करीं कसापाहे ॥ मंदमंदचि केतकीगंध वाहे ॥ १ ॥**

(मनांत) ही मालती, आज हट्टानें मजवर रुसली आहे, तर हिचें समाधान कसें बरें करावें? [विचार करून उघड] सखे, मालती तूं नुकतेच अंग धुतल्या मुळें तुझें अंग गार झालें आहे व मला फार तलखी होत आहे, ह्मणून तुला मी इतकीच विनंती करतो कीं—

पद. चाल. त्रैलोक्याधिप इंद्रही--

**गळती जोंवरि केशांमधुनी जलबिंदू मोत्यापरि ते ॥ पयोधरांचें अंतर तैसें ओलें हें आहे कांते ॥ धारण करिते त्यापरि तुझि ही सुंदर तनु रोमांचा ते ॥ देई तोंवरि सखये मजला प्रेमानें आलिंगन तें ॥ १ ॥**

सखे, मी तुला विनंती करीत असतां मला कां बरें आलिंगन देत नाहींस? अथवा, मलयवात आणि चंद्रकिरण यानीं पोळलेलें जें माझें अंग त्याला तुला आलिंगन देणें नसेल तर आतां असें कर कीं—

## साकी.

**कोकिल गायन ऐकुनि झाली पीडा जी क-र्णाते ॥ ती घालिव तूं निजवचनामृत पाजुनि लौकरी त्याते ॥ जवळी येउनिया ॥ बैस गे रागा सोडुनि या ॥ १ ॥**

सुंदरी कां बरें बोलत नाहींस! हा माधव तुला संभाषणाला देखील अयोग्य झाला काय? सखे, असें काय बरें करतेंस?

**अवलोकिता**—मालती, जो माधव क्षणभर तुझ्या डोळ्यासमोरून दूर झालेला तुला सहन होत नसे, व ज्याला वारंवार आलिंगन देण्याविषयीं तुला उत्कंठा लागत असें, त्या माधवावरच्या प्रेमाचा सांप्रत असा परिणाम कां बरें करितेंस?

**माधव**—( मनांत ) अहो, ही अवलोकिता मला तर केवळ सुभाषितांचें भांडारगृहच दिसतें! (उघड) सखे, अवलोकिता, जे ह्मणते ते खरें असें मला वाटतें.

**मालती**—( मानेनें खरें नाहीं असें सुचवते. )

**माधव**—प्रिये, जर तूं बोलणार नाहींस तर तुला लवंगिका व अवलोकिता यांचीच शपथ आहे.

**मालती**—मला नाहीं कांहीं ठाऊक. (लाजते.)

**माधव**—अहाहा, हे इचे शब्द अपुरते निघाले तरी ते किती गोड आहेत. अवलोकिते, हा पाहिलास कां चमत्कार—

**पद.** चाल. रतिखेद जरि प्रिये ही–

**गाल इचा जों धुतला नयनाश्रू पडुनीया ॥ तों तेथें राहियला शशिकर गे बिंबुनिया ॥ तेणें हें मुखकांतीसुधापान करण्यातें ॥ मज वाटे लावियले बघ विधुनें नलिकेतें ॥ १ ॥**

**अवलोकिता**—वत्से, मालती, या अशा आनंदाच्या वेळीं तुला असें रुसून बसणें शोभतें काय ?

**मालती**—अवलोकिते, लवंगिका मजजवळून जी गेली ती अजून कां बरें आली नाहीं ? तिचें मला कांहींच वर्तमान कळत नाहीं.

**माधव**—अवलोकिते, प्राणसखी, काय ह्मणते ?

**अवलोकिता**—माधवा, तुझ्या शपथेवरून तिला लवंगिकेची आठवण झाली.

**माधव**—मी आतांच नंदनाकडील सर्व वर्तमान कळावें ह्मणून कलहंसकाला त्याच्या घरीं पाठवलें आहे तों इतक्यांत येईल. पण अवलोकिते मदयंतिका मकरंदाला मिळण्याचा बुद्धरक्षितेचा प्रयत्न सफल होईल कां ?

**अवलोकिता**—हे महाभागा, तुला हा संशय कोठून आला ? बरें पण तुला मी असें ह्मणते कीं, मकरंद वाघाच्या पंजानें असावध होऊन सावध झाला असें तुला मालतीनें सांगितलें असतां तूं तिला आपलें मन आणि जीवित बक्षिस दिलेंस ? आतां मकरंदाला मदयंतिका मिळाली असें तुला कोणी सांगितलें तर त्याला तूं काय बक्षिस देशील ?

**माधव**—इनें मला जें विचारावयाचें तेंच विचारलें. ( उघड ) अवलोकिते, मकरंदाला मदयंतिका मिळाली असें जर कोणी मला सांगितलें तर त्याला मालतीचें व माझें प्रथम प्रेम जडले याला साक्ष जो बकूलवृक्ष त्याच्या फुलांचा जो हार माझ्या गळ्यांत आहे तोच बक्षीस देईन.

**अवलोकिता**—( एकीकडे ) मालती, हा बकुलपुष्पांचा हार तुझा फार आवडता आहे तर आतां तूंच मकरंदाला मदयंतिका मिळाली असें सांगून तो घे.

**मालती**—( मनांत ) अवलोकितेनें मला माझ्या हिताचें सांगितलें ( उघड ) प्राणनाथ, मकरंद भाउजींनां मदयंतिका मिळाली हें मी आपणाला अगोदर सांगितलें आहे बरें.

**माधव**—प्रिये, हें वर्तमान तुझ्या मुखांतून ऐकतांच माझे सर्व मनोरथ सफळ झालें. (तिच्या गळ्यांत हार घालून) आतां हा घे तुला हार—

**पद.** चाल. प्रिये तव शिरि हा मणी ही—

**गुंफितांचि जो मी चातूर्यें प्रिय सखिकडूनी तो आणुनिया ॥ निज कुचावरी बहु सन्मानें ॥ ठेवुनि देसी तूं हर्षानें ॥ विवाहकालीं निराश होतां अर्पिसी मजला सखि समजुनिया ॥ ऐसा हारांचि बघ मी तुजला ॥ पुनरपि सखये अर्पण केला ॥ १ ॥**

**अवलोकिता**—भगवतीचा बुद्धरक्षितेवर मोठा भार होता तो आज हलका झाला.

(गडबडीने लवंगिका, मदयंतिका, कलहंसक प्र०क०)

**लवंगिका**—हे महाभागा, आमचें संरक्षण करावें. नंदनाच्या घरून मकरंदासह आह्मी येत असतां वाटेंत शहरच्या बंदोबस्ताकरितां फिरणाऱ्या शिपायांनीं आम्हाला पकडले; इतक्यांत कलहंसकाची गांठ पडल्यामुळें त्यानें आह्माला आपणाकडे लावून आपण एकटाच शत्रूशीं लढण्याकरितां उभा राहिला.

**कलहंसक**—आह्मी इकडे येत असतां मागें मारामारीचा मोठा गलबला ऐकला; त्यावरून मला असें वाटतें कीं, शत्रूनां आणखी मदत येऊन मिळाली असावी.

**मालती**—हायहाय! एकदांच आनंद आणि दुःख हीं माझ्या वाट्याला कशी आली—

पद. चाल. रमवाया जाऊं ही—

**विपरित हें घडलें ॥ आज कसें विपरित हें घडलें ॥ धृ०॥ उत्तम पति तो सखिला मिळतां ॥ हर्षचि झाला बहु मम चित्ता ॥ तों अवचितही ऐकुनि वार्ता ॥ भयभित मी झालें ॥ १ ॥**

**माधव**—एकूण माझ्या मित्राला शत्रूंनीं आडवलें. असो. कांहीं चिंता नाहीं. मदयंतिके तूं येथें आलीस हे फार चांगलें झाले; आतां तूं निःकाळजी ऐस. कारण—

पद. चाल. मला शांत मुनि भासतो ही-

खरे शूर असती न ते समरिं भीती ॥ शत्रु जिंकोनिया विजयि होती ॥ धृ० ॥ सिंह करिशी करी घोर रण जेधवां फोडि कुंभापरी त्यांचि करटे ॥ प्रखर नखराविणे कोणि साह्या जरी त्या न असलें तरी भय न वाटे ॥ १ ॥

कळहंसका—चल मजबरोबर ज्या ठिकाणीं माझा मित्र आपल्या शौर्याला साजेल असें कर्म करीत आहे तेथें आपण जाऊं.

(दोघे जातात.)

लवंगिका—या अनर्थापासून दोघे सुखरूप येवोत.

मालती—अवलोकिते, आजचा प्रसंग फार कठीण दिसतो आहे तर तूं लौकर जाऊन हें वर्तमान भगवतीला कळीव.

अवलोकिता—बरें आहे मी जाते. (जाते).

मालती—सखे, लवंगिके, प्राणनाथ मोठ्या रागानें तिकडे गेले आहेत तर तूं लौकर जाऊन त्यानां माझी अशी विनंती सांग कीं, जर आपणाला मालतीची काळजी असेल तर काय पराक्रम करणें असेल तो शरीराला जपून करावा.

लवंगिका—बरें आहे; मी आतां जाऊन येते. तूं येथेंस ऐस. (जाते.)

**मालती**—अगबाई ! मदयंतिके, मला अपशकुन कां बरं होतात—

**पद.** चाल. प्रिया मीनाक्षी ही—

**सखी नच येई ॥ अजुनी तेथुनि परतुनि कां नच येई ॥ धृ० ॥ दक्षिणनेत्रचि लवतो माझा शंकित हें मन होई ॥ १ ॥ अनर्थ वाटे कांहीं तेथें घडला असेल बाई ॥ २ ॥**

तर मदयंतिके, मी आतां त्यांच्या शोधाला जाते. (पडद्यांत जाते.)

(पडद्यांत शब्द होतो.)

"अगे, पापिणी, उभी रहा, पुढें कोठें चाललीस? तुझा कैवारी तो अधम माझ्या गुरूस मारणारा माधव कोठें आहे; थांब त्याचा सूड घेण्याकरितां तुला आतां मी श्रीपर्वतावर नेऊन तुझे तुकडे तुकडे करते."

**मदयंतिका**—सखे, माळती, मीहीं तुजबरोबरच येते.

(लवंगिका प्र० क०)

**लवंगिका**—मदयंतिके, कोणाला हाक मारतेस? मालती कोठें आहे?

**मदयंतिका**—कोण? लवंगिके; त्यांची व तुझी गांठ पडली का?

**लवंगिका**—नाही नाहीं; त्यांची गांठ मुळींच पडली नाहीं; मी गेले तशाच परत आले; वाटेंत

माधवमकरंद यांच्यावर भयंकर प्रसंग आला ह्मणून त्यांचे गुण आठवून हळहळणाऱ्या लोकांचे विलाप मात्र मी ऐकलें. व आणखी मला असें कळून आलें कीं, आपल्या प्रधानांच्या मुली फसवून नेल्या ह्मणून त्यांचा राजाला फार राग येऊन त्यानें त्यांच्या नाशार्थ आणखी पायदळ पाठवलें आहे व आपण राजवाड्यांतील उंच गच्चीवर बसून चंद्राच्या प्रकाशानें त्यांचा पराक्रम पहात आहे.

**मदयंति**—हाय हाय! किती तरी मी मंद भागिनी!

**लवंगिका**—सखे, परिणाम कळल्यावांचून उगीच दुःख कां बरें करतेंस? मालती कोठें आहे?

**मदयंतिका**—तुला येण्याला उशीर लागला ह्मणून ती तुला शोधालां गेली, त्यावर मी तिला पाहिले नाहीं. कदाचित् या झाडींत असेल.

**लवंगिका**—चल, तिचा लौकर शोध करूं; नाहीं तर हें वर्तमान ऐकून ती जीव देखील देईल.

(तिला शोधतात; व कलहंसक प्र० क०)

**कलहंसक**—(आनंदानें) आजचा दिवस आनंदाचा खरा. आज माधवमकरंद यांनी केवढा तरी पराक्रम केला. शत्रूकडील वीर आपल्या सेनेसह यांच्याशी समर करण्याकरितां आले असतां हे जेव्हां त्यांचीच शस्त्रे घेऊन त्यांच्या लोकानां हाणीत सुटले तेव्हां एकच आरडाआरड होऊन आकाश आणि पृथ्वी

ही एक होऊन गेली. नंतर मुहूर्तानें पाहिले तों सर्व शत्रू पळून जाऊन समरांगण मोकळे झाले; पहा, ती भयंकर सेना आजून मला डोळ्यासमोर दिसत आहे; बरें राजाची गुणग्राहकता तरी केवढी! त्यानें या दोघांचा पराक्रम पाहून मोठ्या आनंदानें आपला चोपदार पाठवून लढाई बंद करवली; व त्यानां मोठ्या सन्मानानें राजवाड्यांत आणून त्यांचे वारंवार गौरव करून त्यानां बक्षिसे दिली. आतां ते दोघे राजाचा निरोप घेऊन इकडेच येत आहेत तर आतां मी हें वर्तमान भगवति कामंदकीला कळवतो.

( नंतर माधव मकरंदप्र० क० )

**मकरंद**—मित्रा, माधवा, आज खचीत तूं लोकोत्तर पराक्रम केलास.

**माधव**—मित्रा, आजच्या भयंकर समरानें माझ्या मनाला तर विरक्तता आली—

**पद**. चाल. ऐशा व्यवहाराभित ही–

**चांदण्यांत जे बसले होते कांता घेवोनी ॥ तोषित झाले तत्प्राशित तें सुरापान करुनी ॥ ते रिपु गेले तव बाणांनीं हतबल होवोनी ॥ सुख दुःखें वा समान येती संसाऱ्या घडुनी ॥ १ ॥**

पण मित्रा, राजा तरी किती कृपाळु आणि सज्जन आहे आपण अपराधी असताही त्यानें आपणावर प्रसाद केला यावरून त्याचे थोरपण सर्वकाल आठवण्यासारखे आहे.

**मकरंद**—बरें मित्रा, चल लौकर. आतां कलहंसक मालतीला आणि मदयंतिकेला ही विजयाची हकीगत सांगत असेल ती आपण जाऊन ऐकू.

**माधव**—ठीक आहे; चल. (चालून) अरे येथें कोणी नाहीं.

**मकरंद**—मित्रा, आपण दोघेही येथें नसल्यामुळें त्या करमणुकीकरितां या झाडींत फिरून वेळ घालवीत असतील. तर तिकडे जाऊन त्याना पाहूं.(फिरतात)

**लवंगिका**—मदयंतिके, ही पहा मालती.

**माधव**—लवंगिके, कोठे आहे मालती?

**लवंगिका**— मालती कोठें गेली कोणजाणे. आह्मी तिलाच शोधीत आहों. इतक्यांत तुह्माला पाहून मला तिचा भास झाला.

**माधव**—लवंगिके, मालती न पाहिल्यानें माझें मन फार कासावीस होत आहे. याकरितां ती कोठें आहे हें लौकर सांगा.—

## साकी.

**कमलाक्षीवरि अरिष्ट आलें येउनि शंका ऐसी ॥ जिव तळमळतो, वामनेत्र हा लवतो तुमची तैसी ॥ शंकित वचनें हीं ॥ सुचविति येथें ती नाहीं ॥ १ ॥**

**मदयंतिका**—आपण येथून गेल्यानंतर तिनें भगवतीला तें वर्तमान कळवण्याकरितां अवलोकितेला पाठवलें, व आपणाला जपून पराक्रम करण्याविषयीं

सागण्याकरितां लवंगिकेला पाठवले. तिला जाऊन फार वेळ झाला ह्मणून शोध करण्याकारितां मालती गेली; ती कांहीं अजून आली नाहीं.

माधव—हा प्रिये मालती! (मूर्च्छीत पडतो.)

मकरंद—मित्रा, कदाचित् ती भगवतीच्या घरीं गेली असेल; तर चल आपण तिकडे जाऊन पाहूं.

दोघी—होय; असेंही असेल.

माधव—ईश्वर कृपेनें ती तेथें असो. हे प्रिये, मालती—

पद. चाल. या विरहा कां भीसीही—

विनोद दे सोडोनी ॥ या कालीं विनोद दे सोडोनी ॥ धृ० ॥ शंका ये मज अपाय कांहिं घडला तुजलानोनी ॥ १ ॥ व्याकुल झालो अंत न पाही सुखवी गे भेटोनी ॥ २ ॥ हरलो सखये प्रत्युत्तर दे विरहें जातो जळुनी । ३ ॥

(सर्व जातात.)

अंक चौथा समाप्त.

# अंक पांचवा.

(तदनंतर सौदामिनी प्र० क०)

**सौदामिनी**—कपालकुंडला माधवाचा सूड घ्यावा ह्मणून मालतीला ठार मारण्याकरितां या श्रीपर्वतावर घेऊन आली असतां या सौदामिनीनें आपल्या योग सामर्थ्यानें तिजपासून तिला सोडवली. सांप्रत मी असें वर्तमान ऐकलें आहे कीं, माधव मालतीच्या दुःखाने वेडा होऊन तिजसहवर्तमान सुखाचे दिवस त्यानें ज्या प्रदेशांत घालवले त्यांचा त्याला कंटाळा येऊन तो आपल्या मित्रासह या अरण्यांत तिचा शोध करीत पर्वताच्या गुहांतून फिरत आहे; तर आतां मी योगबलानें तेथें प्रगट होऊन त्याला खूण करितां हा मालतीजवळून घेतलेला बकुलपुष्पांचा हार दाखवून त्याचें शांतवन करते. ( कांहीं चालून ) अहाहा ! या अरण्यांत किती तरी ही किर्र झाडी आहे यांतून सूर्य किरणांचा देखील प्रवेश होत नसेल तसाच या मधून हा गोदावरीचा प्रवाह वेगानें वहात असल्यामुळें या पर्वताच्या गुहा दणाणून जाऊन मला तर दंडकारण्याचाच भास होत आहे. असो. बराच वेळ झाला याकरितां येथें मधुमती आणि सिंधू यांच्या संगमावर असलेल्या सुवर्णबिंदु नामक शिवलिंगाचें दर्शन घेऊन लौकर माधवमकरंदाचा शोध करावयाला जावे.

( असें ह्मणून जाते )

हा विष्कंभक झाला.

( तदनंतर मकरंदासह माधव प्र० क० )

**माधव**—( दुःखानें ) हा प्राणप्रिये मालती तूं कोठें आहेस, एकाएकी सर्वांना न कळतां कशी नाहिशी झालीस ? सखे—

**साकी.**

**प्राणाहुनिही प्रिय बहु होता जो हा माधव तुजसी ॥ कंकणमंडितकर देऊनिया केलें धन्यचि ज्यासी ॥ या तव भर्त्याते ॥ सोडुनि जासी कां कांते ॥ १ ॥**

हायहाय ! मित्रा, मकरंदा, या जगांत अशा प्रेमाचा लाभ पुनः होणें दुर्लभ आहे. पहा.—

**दिंडी.**

**फुलाहुनिही सुकुमार अवयवाहीं ॥ मदन पीडा सोसिली तिनें पाही ॥ जीव तृणसम मानुनी वरायाते ॥ मला मनिं ती नच धरी बा भयाते॥१॥**

मित्रा मकरंदा, पहा माझी काय दशा झाली आहे ती—

पद. चाल. वैभव माझे ही–

**जरि भेदियले शोकें हृदया नच दुभागिले तरि त्याते ॥ मूर्च्छेनें तनु व्याकुल केली परि नच हरिले प्राणाते ॥ दुःखाग्नीच्या ज्वालेनेही नच मिळलों मी भस्माते ॥ वारंवारचि मर्मे ऐसी भेदुनि रक्षी विधि माते ॥ १ ॥**

मकरंद—मित्रा, माधवा, दैवाप्रमाणें हा सूर्यही पीडा करावयाला लागला आहे ; आणि सांप्रत तुझी तर अशी दशा झाली आहे ; ह्मणून दोन घटका या सरोवरावर बसून जरा विसावा तरी घेऊं. येथें—

**साकी.**

**लक्ष्मीसदनां कमलां तैशा कुसुमित या सहकारा ॥ हलवुनि यांचा सुगंध हरुनी वाहे जो हा वारा ॥ सुखवो तो तूते ॥ हरुनी तुझिया तापाते ॥ १ ॥**

माधव—मित्रा, जसें तुला आवडेल तसें. (दोघे तसे करितात.)

मकरंद—याला तर मालतीचें अगदीं वेड लागून गेलें आहे ; तर आतां येथें याचें मन दुसरीकडे वळवून तिचा कांहीं विसर पडला तर पहावा. (उघड) मित्रा, पाहिलीसकां या अरण्यांत कशी ही अद्भुत शोभा दिसत आहे ती.—

**पद.** चाल. बाळा जो जो ही–

**कदंबकुसुमें तीं बघ कैसी गिरिवरि विकसुनि जाती ॥ तैसीं नदितीरीं केतकिची झाडें फुलली असती ॥ पाहे मेघांनीं सर्व दिशा सांप्रत काळ्या होती ॥ वाटे सुममीषें या साऱ्या वनावली हंसताती ॥ १ ॥**

माधव—मित्रा, मकरंदा तूं या वनसौंदर्याचें फार

चांगलें वर्णन केलेंस, आणखी हा पहा काय चमत्कार झाला आहे तो.—

अंजनी गीत.

**मेघकाल हा समीप येउनि ॥ घर्म निघे तो अंगामधुनी ॥ क्षणमात्रे परि नाशा पावुनि ॥ शरीर सुख पावें ॥१॥ इंद्रनील मणी जैसे असती सांप्रत तैसे घन हे दिसती ॥ जलधारा या वर्षुनि करिती ॥ निर्मल ही धरणी ॥ २ ॥**

मित्रा, सांप्रत या अरण्यभूमी रमणीय दिसतात खऱ्या; पण त्यानां पाहून मला सुख न होता उलट त्रास मात्र होतो; पण, असें कां होतें, याचें कारण कळत नाहीं. (विचार करून) अथवा दुसरें काय? (दुःखानें) हा प्रिये, मालती—

**पद.** चाल. हातजलतोही—

**वर्षाया नीरधारा घन जेथें पातले ॥ आकाशीं चाप तैसे इंद्राचे शोभले ॥ कामाते वाढवीती या कालीं ज्या दिशा ॥ तुजविण मी सांग कांते बघु येथें या कशा ॥ १ ॥**

(असें ह्मणून मूर्च्छीत पडतो.)

**मकरंद**—सांप्रत याची दशा तर फार कठीण दिसत आहे. शिवशिव! हे चंद्रवदने मालती, कांहीं कारण नसतां तूं माधवाला सोडून गेलीस; त्या अर्थीं तूं फार निष्ठुर आहेस यांत संशय नाहीं. किती

तरी मी निर्दय ! याची अशी दुर्दशा झाली असतां मला वनशोभा पहाण्याचे सुचत आहे माधवा, सावध होकीरे. या तुझ्या बालपणच्या मित्राविषयीं असा निर्दय होऊं नकोस. [ मूर्च्छीत पडतो ; माधव सावध होतो. ]

मकरंद—(सावध होऊन) हा नीलवर्ण नूतन मेघ जलबिंदूंचा वर्षाव करून माझ्या मित्राला सावध करीत आहे; हें पाहून आज सर्व जगाचा पुनर्जन्म झाला असें मला वाटते.

माधव—या अरण्यांत माझ्या प्रियेकडे निरोप घेऊन जाणारा मला कोणी मिळेल काय ? [ पाहून ] हं फार चांगलें झालें; या झाडींमधून जी ही नदी वहात आहे तिच्या उत्तर दिशेला हा मेघ आलेला आहे ; तर त्या बरोबरच प्रियेला निरोप पाठवावा—[ हात जोडून ].

पद. चाल. निर्धनतेनेंही—

हे मेघेशा याकालीं मी एकचि तुज लागुनी ॥
विनती करितो आणी मनीं ॥ धृ० ॥
चाल ॥ तुज सुखवीते ती चपला आलिंगुनी ॥
तो चातक राहे तत्पर तव सेवनी ॥
चाल ॥ इंद्रचाप हे पसरे तुजला अति शोभा देउनी ॥
विनती करितो आणी मनी ॥ धृ० ॥

हा मेघ आपल्या गर्जनेने मला 'होय' ह्मणून प्रत्युत्तर देत आहे, तर आतां याला निरोप सांगावा. हे मेघराजा—

## साकी.

स्वच्छंदें तूं फिरतां दैवे बघशिल जरि ममकांता ॥ तरि आश्वासुनि तिजला कळवी इकडिल सारी वार्ता ॥ हरिशीं तापाते ॥ ह्मणुनी करितो विनतीते ॥ १ ॥

अरे, हा मेघ तर निघाला; असो, आपण दुसरीकडे जावें.

मकरंद—हर हर. याला तर पुरे वेड लागलं! हाताता! हा भगवति, पहा, या माधवाची काय दशा झाली आहे ती!

माधव—अहो, पर्वतारण्यवासी हो, मी तुह्माला नमस्कार करून विज्ञापना करितो; कृपा करून मला एवढें सांगा.—

पद. चाल. हरिणाक्षी ती प्रिया. ही.

जिचि सर्वांगें रमणिय असती ऐशा माझ्या मालतिची ॥ गति जरि कोणा ठाऊक असली सांगा मजला ती साची ॥ लक्षण तुह्मा कथितो तीचे मन्मथ अंतरि वसुनीया ॥ आविर्भाव ती साचा कधिंही दाखविते न्दच वरुनीया ॥ १ ॥

काय ? हे कोणीही मला उत्तर देत नाहींत, असो. ( पाहून ) याठिकाणीं हा गजराज, आपल्या प्रियेच्या खांद्यावर सोंड ठेवून व चंदनाच्या फांदीला मान टेकून विश्रांती घेत बसला आहे ; तेव्हां, यालाही विचारण्याचा हा समय नाहीं ; ( पुढें पाहून ) अहो, हा काय चमत्कार ! हा एक मत्त हत्ती सरोवरांत शिरून विहार करीत आहे ; याच्या कर्णप्रहारांनीं मोठमोठ्या लाटा फुटून जाऊन सर्व चलचर प्राणी गोंधळून गेले आहेत ; तशीच याची गर्जना ऐकून यासह संचार करणारी हत्तीण किती आनंद पावत आहे ; तर याला विनंती केली असतां, तो तिजकडे लक्ष देईल. ( हातजोडून ) हे, गजपते, तुझी तारुण्य श्री वर्णन करण्यासारखी आहे ; व स्त्रीला कसें रंजवावें हें ही तुला समजत आहे.

## साकी.

श्रांता बघुनी कांता तिजवरि उडविशि जल शुंडेनें ॥ तैसें धरिशी छत्रापरि हें पुष्कर सुप्रेमानें ॥ देशी सुख तीते ॥ करितो तुजमी विनतीते ॥ १ ॥

अरे, मी याचें इतकें गौरव केलें असतां हा मदांध मला कांहींच उत्तर देत नाहीं ; अथवा, या मुर्खाच्या नादीं काय लागावयाचे आहे ; आपण दुसरीकडे जावें; ( पाहून ) शिव शिव ! माझ्या प्रियसखीचा घात झाला.

पद.

लोध्रांचीं हीं सुंदर कुसुमें दाखविती तिची कांती॥हरिणी जतळी तैसी दिसते सुंदरिचीदृष्टी ती॥ कोमलता ही या वेलींच्या ठायीं बघुनी माते॥ वाटे यानीं तिजला वधुनी लुटिलें लावंण्यातें॥१॥

अरे, मला वेड तर लागलें नाहींना? मी मालतीच्या भ्रांतीनें जीं भाषणें प्रियमित्र मकरंद याजबरोबर करावयाचीं ती यापर्वतारण्यवासी वृक्षाशीं करीत आहे, धिक् माझें जिणें कीं मला माझ्या प्रिय मित्राची देखीळ विस्मृती पडली. मित्रा, मकरंदा—

मकरंद—मित्रा, हा मी मंदभाग्य मकरंद जवळच आहे.

माधव—मित्रा, आतां मला मालती भेटायाची मुळींच आशा राहिली नाहीं याकारितां तूं तरी एक वार भेट. ( मूर्च्छीत पडतो. )

मकरंद—हरहर! याला माझ्या भेटीची उत्कंठा लागली तोंच हा निश्चेतन पडला. अरे, हा कांहींच हालचाल करीत नाहीं! शिव शिव! या भयंकर समयापेक्षां मघां गेलेला काळ फारच चांगला, कारण मालतीविरहानें दुःखीत असा तरी मी याला जीवंत पहात होतो हायरे मित्रा, माधवा, हें कसें झालें?

पद.

चिंताज्वर हा लागुनि हृदयीं सखिच्या प्रेमानें॥
अनिष्ट कांहीं घडुनी येईल तुज सायोगानें॥

ऐशा धाकें क्षणोंक्षणीं जें मन माझें भ्यालें ॥
दुर्दैवानें सांप्रत अवघे घडुनीं तें आलें ॥ १ ॥

हर हर! अरे, मुर्खा, मकरंदा, माधवाचें वास्तवीक मरण पहावें ह्मणून तूं अजून जिवंत राहिला आहेस कां? आतां याची पुढची दशा बघणें कांहीं नीट नाहीं; तर याच्या अगोदरच यापर्वतावरून खाली जी पाटलावती नदी वहात आहे तींत उडी टाकून आपण परलोकाला जावें. (कांहीं चालून) मी तर जीव देणारच! पण यानें मला कडकडून भेटण्याविषयीं विनंती केली आहे तर अशा स्थितींत देखील त्याला भेटावें; (तसें करून) मित्रा, माधवा, तुझी माझी हीच शेवटची भेट बरें; शिव शिव! अहो, हा माधव लहान वयांत इतका गुणी निघाला असतां पहा याची काय दशा झाली ती—

पद. चाल अप्रातिरथहाहि.

उदया येउनि जैसा विधु तो राहूनें ग्रासावा ॥
कीं भरलेला मेघची उदकें वातें फांकुनि जावा ॥
फळभारानें शोभित शाखी वणव्यानें जाळावा ॥
तैसा माधव आजाचि गेला कैसे हें दुर्दैवा ॥ तुजला आवडलें ॥ मज तद्विरहीं बुडवीलें ॥ १ ॥

असो. आतां आपण ठरल्याप्रमाणें करावें. हीच ती पाटलावती नदी! हे भगवन् गौरीपते, माझ्या मित्राचा जेथें जन्म होईल तेथेंच मला पुनः जन्म दे ह्मणजे

त्याची माझी निरंतर संगत राहिल. (उडी टाकणार तों सौदामिनी प्रगट होते.)

**सौदामिनी**—वत्सा, असें साहस करूं नकोस.

**मकरंद**—मातुश्री, आपण कोण आहांत व माझें निवारण कां करितां?

**सौदामिनी**—वत्सा, तुझेंच नांव मकरंद काय?

**मकरंद**—होय. मीच तो हतभाग्य मकरंद. पण तुह्मीं मला सोडा. माझ्या मित्राच्या अगोदर मला परलोकाला जाऊं द्या.

**सौदामिनी**—वत्सा, असा उतावळा होऊं नकोस. मी योगिनी आहे व मला मालतीची माहिती आहे ही पहा मजजवळ तिची खूण आहे. (माला दाखवते.)

**मकरंद**—(पाहून) मातुश्री, मालती खुशाल आहेना?

**सौदामिनी**—होय खुशाल आहे; पण तूं असा जिवावर कां उदार झालांस? माधव कोठें आहे?

**मकरंद**—मातुश्री, तो मालतीच्या दुःखानें व्याकुल झालेला पाहून माझें धैर्य अगदीं गळालें. आणि त्याच्या वेदना पहावेनातशा होऊन जीव देण्याला इकडे आलों. इतक्यांत आपण हें आनंदाचें वर्तमान सांगितलें हें फार चांगलें झालें; आतां लौकर चला; आपण त्याला सावध करूं. (माधवाजवळ जातात.)

**सौदामिनी**—मालतीनें या दोवांविषयीं ज्या खुणा सांगितल्या त्या सर्व आतां मला पटतात.

माधव–( सावध होऊन ) अरे मी व्याकुळ होऊन पडलों असतां मला सावध कोणी केलें? हं समजलों; हा मेघमंडलांतून सजलवायु आला यानें मला सावध केलें; पण हें कांहीं त्यानें चांगलें केले नाहीं; मूर्च्छा येऊन प्रियेच्या विरहाचें दुःख अमळ विसरलों होतों तें मात्र आतां पुनः होऊं लागलें. [ हातांची अंजळी करून ] हे वायो, तुला मी इतकीच विनंती करतों कीं,—

साकी.

असेल जेथें सुंदरी तेथें मम जीवित नेवोनी ॥
किंवा तीच्या शरिरा लागुनि मग इकडे येवोनी॥
सुखवी देहा या ॥ दुःखांतुनि मज ताराया ॥ १ ॥

सौदामिनी—मालतीनें मजजवळ खुणेकरिनां जो हार दिलेला आहे; तो आतां यांच्या हातांत टाकावा. ( तसें करिते )

माधव—( पाहून ) कायहो, मदनोद्यानांत बकुलपुष्पें वेंचून जो गुंफलेला हार मी आपल्या प्रियेला दिला होता तोच हा हार काय? ( विचार करून ) हाय तोच ! कारण त्या वेळीं माझें मन मालतीकडे वेधून गेल्यामुळें हा एका अंगाला बिघडला होता; तसाच सांप्रत दिसत आहे. ( हर्षानें ) अगे, मालती लपतीस कशाला ! तूं येथेंच आहेस; मीं तुला पाहिलें. सखे तुझ्या वियोगानें माझी अशी दशा झाली असतांही तूं अजून विनोद करते आहेसना ! सखे, लौकर

घेऊन मला भेट किंगे ! ( विचार करून ) शिवशिव येथें कशाची मालती ! हा हार पाहून मला तिचा भास झाला ! असो हा हार माझ्या प्रियेचा आवडता आहे; म्हणून याला बघून मला फार आनंद वाटतो. हे बकूळपुष्पहारा—

पद. चाल. उठिरे उठिरे करुणा कराही—

बघुनी मजसी या सुंदरिला ॥ कामज्वर तो हृदयीं जडला ॥ धरि ती तुजशी देशी माझ्या संगमसौख्यासमसुख तिजला ॥ विवाहकाळी दे ती मजला ॥ मी अर्पियले पुनरपि तिजला ॥ सांप्रत येशी ममकरिं ऐशा खेपा पडल्या किति तरि तुजला ॥ १ ॥

( हार उरावर ठेवून मूर्च्छीत पडतो. )

मकरंद—मित्रा, सावध हो, सावध हो,

माधव—मित्रा, मकरंदा, मालतीचें मूर्तिमंत प्रेमच असा तिच्या गळ्यांतील हा बकुलपुष्पांचा हार माझ्या हातांत अकस्मात कोठून बरें आला?

मकरंद—मित्रा, हा सर्व या योगिनीचा प्रसाद आहे.

माधव—मातुश्री, मजवर प्रसाद करा. आणि माझ्या प्रियेचें कुशल वर्तमान मला सांगा.

सौदामिनी—वत्सा, ऐक पहिल्यापासून सांगते. पूर्वीं कराला देवीच्या मंदिरांत अघोरघंट मालतीला बळी देण्याकरितां घेऊन आला असतां तूं

त्याला ठार मारून तिला सोडवलेंस. तेव्हां तुझा सूड घेण्याकरितां कपालकुंडला मालतीला एकटीच उचलून घेऊन श्री पर्वतावर गेली.

माधव—मातुश्री, पुरें करा आतां! सर्व मला समजलें.

मकरंद—मित्रा, सर्व समजलें ह्मणतोंस तें काय?

माधव—दुसरे काय? त्या कपालकुंडलेनें आपलें मनोरथ सफळ केले. शिवशिव! हे भगवति कपालकुंडलें

अभंग.

सुंदर कुसुमा मस्तकिं ठेवुनि सुवास घेउनि सुख मानावें ॥ तें नच करितां मुसलाघातें कांडुनि सारें टाकावें कीं ॥ १ ॥ तशि सुकुमारी मम कांता ती जरि तव हस्तीं दिधली दैवें ॥ तरि सोडुनिया तत्संरक्षण हें राक्षसपण अनुचित केल ॥ १ ॥

सौदामिनी—वत्सा, पुरें वर्तमान न ऐकतांच असा शोक कां बरें करतोंस? कपालकुंडला मालतीचा जीव घेण्याकरितां श्री पर्वतावर घेऊन अ ली असतां मी तिजपासून तिला सोडवली.

माधव—मातुश्री, मग आपल्या चरणांनीं मजवर मोठाच प्रसाद केला. तर निष्कारण उपकार करणाऱ्या आपण कोण आहोत; व माझी प्रिया कोठें आहे हें सांगावें.

सौदामिनी—वत्सा, मी कोण आहे हें तुला

मागून कळेलच. अगोदर मजबरोबर चल ह्मणजे तुझी व मालतीची भेट करवून मला जी जगताकर्षणी विद्या येत आहे ती मी तुला सांगते.

**माधव**—मातुश्री, हा मी येण्याला तयार आहे चलावें

**सौदामिनी**—वत्सा चल. (माधव सौदामिनी जातात.)

**मकरंद**—(पाहून) अरे' एकाएकी हा काय चमत्कार झाला.

**साकी.**

**तम चपलेच्या तेजीं मिळतां नयनांची वृत्तीही**
**क्षणभरि खुंटलि तों नच येथें मित्र दिसे कोठही ॥**
**आहे योगिनीची ॥ अद्भुत शक्ती ही साची ॥१॥**

काय झाले असेल तें असो. आपण आतां लौकर जाऊन या आरण्यांत लवंगिका व मदयंतिका यासह भगवति कामंदकी आल्या आहेत; त्याना हे वर्तमान कळवावें. (जातो.)

(तदनंतर कामंदकी, लवंगिका, व मदयंतिका प्र. क.)

**कामंदकी**—हा वत्से, मालती, तूं कोठें आहेस; या मंदभागिनीला टाकून कोठें गेलीस ? बाळे—

**साकी.**

**बाल्यापासुनि क्षणोक्षणीं ज्या केल्या विचित्रलीला**
**॥ गोडबोलगे वदालिस आतां आठवुनी ते मजला ॥**
**या तव विरहाचें ॥ दुःखाचि होई बहु साचें ॥ १ ॥**

**मदयंतिका**—सखे, मालती, तूं आह्माला सोडून कोठें गेलीस. शिरसाच्या फुलासारख्या तुझ्या नाजुक शरीराची संकटांत पडून काय गती झाली असेल.

**लवंगिका**—हे भाग्यवंता, माधवा तुला संसार सुखाचा ठेवा सांपडतो न सांपडतों तोंच कसा दुर्दैवानें तुझ्या हातचा हिसकावून नेला ?

**कामंदकी**—वत्से, मालती ही तुझी बालपणांतली मैत्रीण लवंगिका हीला वियोग दुःखांत लोटून तुला जाणें बरोबर वाटलेना ? वत्से या कामंदकीला तूं अगदींच कशी विसरलीस—

**पद.** सोडोनीया सुकुसुम ही.

**बाल्यापासुनि तुज वाढविले ॥ घेऊनि मांडीवरि खेळविले ॥ सदा तुझे हित चिंतन केलें ॥ तूं जननी सम मज मानियले ॥ सन्मर्गात तुज लावियले ॥ उत्तम पातिला मिळवुनी दिधले ॥ कां मग मजला दुःखित केलें ॥ देउनि तनये अंतर अपुलें ॥ १ ॥**

**लवंगिका**—हा दुष्टा हृदया, मालतीच्या दुःखानें तू दुभागत नाहींस तेंव्हां तूं वज्रासारखा कठोर आहेस.

**कामंदकी**—वत्से, मालती, तुला एखादा मुलगा होऊन तो तुझ्या मांडीवर खेळत असतानां पाहण्याची जी मला आशा होती ती कशी दुर्दैवानें लोपुनटाकली !

**लवंगिका**—अहो, भगवति, हें मालतीचें वियोग दुःख आतां कांहीं माझ्यानें सहन करवत नाहीं ह्मणून

यापर्वतावरून देहपात करून घेऊन मी सुखी होणार. तर जन्मांतरीं पुनः मी आपल्या सखीला पाहीन; असा, तुमचा मला अशीर्वाद असावा.

**कामंदकी**—वत्से, लवंगिके, तूं जीव देण्याला तयार झालीस तर मला कोठें वांचावयाचें आहे; मालतीचें वियोगदुःख तुला आणि मला सारखेंच आहे; ह्मणून तूं आणि मी दोघींही एकदम देहपात करून सुखी होऊं.

**लवंगिका**—आपली आज्ञा मला मान्य आहे.

**कामंदकी**—वत्से, मदयंतिके, तूं पुढें चालूं लाग.

**मदयंतिका**—भगवति, ही मी तयार आहे.

**लवंगिका**—सखे, मदयंतिके, मजवर दया कर आणि हा जीव देण्याचा निश्चय सोडून दे. कधीं कधीं या लवंगिकेची आठवण करीत जा हो.

**मदयंतिका**—चल हो एकीकडे मी कांहीं तुझी बांधलेली नाहीं.

**कामंदकी**—इने देखील जीव देण्याचा निश्चय केला काय ?

**मदयंतिका**—हे प्राणप्रिया, मकरंदा तुला माझा शेवटचा नमस्कार असो.

**लवंगिका**—भगवति, मधुमति नामक नदीच्या प्रवाहाने ज्याचे कडे पवित्र झाले आहेत तोच हा श्रीपर्वत ; यावरून आपण देहपात करून घेऊं.

**कामंदकी**—मग आतां तसें करण्याला विलंब कां करितां. शिव शिव हे मालतीमाधवानो, तुमची अशी दशा कशी झाली—

## साकी.

**जैसी जाती चंपक तरुते मिळते मालति तैसी ॥**
**माधवास या मिळतां यांचा वियोग करण्या कैसी॥**
**तेथे वावटळी ॥ अवचित दैवगती आली ॥ १॥**

(सर्व देहपातकरून घेणार तोंच मकरंद प्र०क०)

**मकरंद**—अहो, भगवति, थांबा थांबा; आपण समंजस असून असें काय बरें करितां ?

**कामंदकी**—वत्सा, मकरंदा, मालतीसह माधव खुशाल आहे ना ?

**मकरंद**—होय भगवति खुशाल आहे.

**कामंदकी**—वत्से, मदयंतिके, लवंगिके, हें वर्तमान ऐकून तरी थोडा धीर धरा.

पडद्यांत शब्द होतो.

" अहो, हा पहा काय अनर्थ ओढवला आहे तो ! आपल्या मुलीचा नाश झाला असें समजून हा अमात्य भूरिवसू सर्व राज्यकारभार सोडून अग्निकुंडांत आपल्या प्राणाची आहुति देण्याकरितां या सुवर्णबिंदु क्षेत्रीं आला आहे."

**कामंदकी**—हर हर ! एकदांच आनंद आणि दुःख भोगण्याचे आमच्या कपाळीं कसें आलें.

**मकरंद**—या प्रसंगीं हें कसें झाले—

पद—चाल. प्रतिकुल होईल ही—

चंदनरस लागुनि अंगा असि वरती पडली ॥
अग्नीकण मिश्रित किंवा सुधाधार आली ॥
मज वाटे तम चपलेचे मिश्रण करण्याची ॥
विधि इच्छा धरुनी देई सुखदुःखें साचीं ॥ १ ॥

( पडद्यांत )

" अहो, बाबा, थांबा थांबा, तुमच्या दर्शनाविषयीं उत्कंठित झालेली ही तुमची कन्या भेटण्याच्या अगोदर असें साहस करूं नका."

कामंदकी—( डोकून ) शाबास! वत्से, मालती, चंद्रकलेचें भक्षण करण्याकरितां जसा राहू उपस्थित होतो तसा तुझा नाश करावयाला हा भूरिवसूच्या प्राणत्यागाचा अनर्थ उपस्थित झाला नाहीं; तोंच तूं त्याला येऊन भेटलीस हें फार चांगलें झालें.

(तदनंतर मूर्च्छित झालेल्या मालतीसह माधव प्र. क.)

माधव—हरहर! काय हा भयंकर प्रसंग—

साकी.

प्रवास दुःखें भोगुनि जों ही मालति येथें आली ॥
तों जनकाची विपरित वार्ता अशी तीनें ऐकियली
असेल भाळीं तें ॥ कोणालाही नच टळते ॥ १ ॥

मकरंद—मित्रा, माधवा, तूं आलास आणि ती योगिनी कोठें आहे?

माधव—श्री पर्वतापासून आम्ही तिजसह इकडे

येत असतां वाटेंत भूरिवसूला भेटावयाला गेलों; त्या धांदलींत तिची आमची चुकामुक पडली.

**मकरंद**—हे महाभागे, पुनः दर्शन देऊन तूं आमचें रक्षण केलें पाहिजे.

**लवंगिका**—सखे, मालती, मी तुला हाक मारीत असतां तूं मला ओ कां बरें देत नाहींस? (घाबरून) अहो भगवती, बापाच्या दुःखानें पहा या मालतीची कशी दशा झाली आहे ती! हिला सावध करा. (सर्व वारा घालतात.)

**कामंदकी**—जशी मेघापासून अवचित वृष्टि होते तसें हें कसें झालें?

**माधव**—मित्रा, मकरंदा अरे ही पहा मालती सावध झाली—

(मालती सावध होते.)

**माधव**—

पद. चाल. कुचाग्र ससिंचेही—

**जीवित येउनि सखिला बघही सोडी श्वासो-श्वासाते ॥ कुच विकसुनिया जाती तैसी टवटवि आली नेत्रांते ॥ प्रभातकालीं रमणिय शोभा दिसते कमला माजी ती ॥ बघ याकालीं हरिणाक्षीच्या वदनावरती मज दिसती ॥ १ ॥**

**मालती**—(पायांपडून) कां भगवति, खुशाल आहांना?

**कामंदकी**—वत्से, मालती, सर्व संकटांतून तूं

सुखरूप पार पडल्यामुळें आमचे सर्वांचे प्राण ठिकाणीं आले; आतां आपल्या पतीसह निरंतर सुखांत ऐस.

**लवंगिका, मदयंतिका**—सखे, मालती, तुझी पुनः भेट होईल अशी आह्मांला मुळींच आशा राहिली नव्हती. ये आतां आह्मांला एकदां कडकडून भेट.

**मालती**—(भेटून) हायहाय! प्रिय सखीनो, मजसाठीं तुह्माला फार दुःख भोगावें लागलें; पण दैवानें त्याचा परिणाम चांगला केला.

**कामदंकी**—वत्सा, माधवा, हें कसें घडलें?

**मकरंद**—भगवति, हा सर्व त्या योगिनीचा प्रसाद आहे. कराला देवीच्या देवळांत माधवानें अघोर घंटालामारून मालतीला सोडवल्यामुळें कपालकुंडलेनें त्याचा सूड घेण्याकरितां तिला श्रीपर्वतावर नेली असतां त्या योगिनीनें तिजपासून तिचें संरक्षण केलें.

**लवंगिका**—माझ्या सखीला दैवानें केवढ्या तरी अनर्थांत घातलें होतें?

**कामदंकी**—एकूण हा अनर्थ सर्व त्या कपालकुंडलेनें केला. बरें, वत्सा, ती योगिनी कोठें आहे?

(इतक्यांत सौदामिनी प्र० क०)

**सौदामिनी**—भगवति, आपणालाही तुमची पूर्वींची शिष्यीण सौदामिनी प्रमाण करिते.

**कामदंकी**—कोण सौदामिनी? वत्से, तुझें कुशल आहेना?

**सौदामिनी**—होय भगवति.

**मकरंद**—भगवति, हीच ती योगिनी. हिनेंच कपालकुंडलेपासून मालतीला सोडवून आपल्या घरीं नेऊन तिचें रक्षण केले; व तिजपासून खुणे करतां आणलेली माळा दाखवून त्याचें शांतवन केलें.

**कामंदकी**—तर मग जें झालें तें बरोबरच झालें. वत्से, सौदामिनी तुझे आम्हां सर्वांवर अगणित उपकार झाले आहेत.

**माधव**—ही योगिनी तर भगवतीची शिष्यीण आहे!

**सौदामिनी**—भगवती, अमात्य भूरिवसू कन्येच्या विरहानें सुवर्णबिंदुतीर्थी अग्निकुंडांत उडी टाकण्याला आला असतां मी त्याचें समाधान करून त्याला पुनः नगरांत घेऊनगेलें; नंतर तेथें त्याच्या दर्शनाविषयीं उत्सुक झालेल्या सर्व लोकांना आनंद झाला असतां त्याच्या व नंदनाच्या विचारानें राजानें हें पत्र लिहून आपणाला दिलें आहे. तें वाचा. (पत्र देते)

**कामंदकी**—(वाचते) इकडील सर्व वर्तमान कुशल आहे; विशेष भगवतीच्या चरणीं इतकीच विनंति आहे कीं:—

**पद**. चाल. मम जीवाची प्रियकरणी ही.

**भूरिवसूचा जामाता ॥ सत्कुलसंभव माधव होता तोषचि झाला बहु मम चित्ता ॥ दुःखे याची संपलि सारीं आणखि करण्यां तत्प्रिय आतां ॥ नंदनभगिनी मदयंतीका मकरंदाची होवो कांता ॥ १ ॥**

**माधव**—कायहो हें आश्चर्य !

साकी.

चिंतामणि दे चिंतित ह्मणूनी नच विशेष तो कांहीं ॥परि चिंतित तें नसतां करिते प्रिय अमुचें योगिनी ही ॥ वानू किती इते॥ बळ नच या मम वाणीते ॥ १ ॥

**कामंदकी**—वत्सा, माधवा, राजानें पाठविलेलें पत्र ऐकलेंसना ?

**माधव**—होय भगवति ऐकलें. राजानें मदयंतिका मकरंदाला दिल्यामुळें आमच्या मनांतील सर्व भय नाहींसें झालें.

**लवंगिका**—भगवतीच्या प्रसादानें आज मालतीचे व माधवाचे सर्व मनोरथ सफल झालें.

**सौदामिनी**—विशेषेंकरून या प्रसंगीं अमात्य भूरिवसू व देवरात यांचे मनोरथ सफल झाले. कारण दोवांच्याही मनांत एकमेकांशीं अपत्यसंबंध करावा, असें होतें तसें घडून आलें.

**मालती**—धाकटी भगवती हें काय म्हणते ?

**माधव**—भगवती, अमात्य भूरिवसूच्या इच्छेविरुद्ध घडलें असतां आर्या सौदामिनी हें काय म्हणते ?

**कामंदकी**—वत्सा, सौदामिनी म्हणते तें खरें आहे; कारण गुरुग्रही असतां अमात्य भूरिवसू व देवरात यांची आमच्या साक्षीनें आपण एकमेकांशी अपत्यसंबंध करूं अशी शपथ झाली होती. व

त्याप्रमाणेंच हें घडून आलें. आतां मी जी ही मसलत केली याचें कारण इतकेंच कीं राजाचा भूरीवसूवर कोप होऊं नये.

**माधव**—काय हो ही खोल मसलत. अथवा, थोरांच्या मसलती सामान्य जनांच्या कोठून लक्षांत येणार?

**कामंदकी**—वत्सा, माधवा, तुझें हीत करण्या करितां आपर्यंत मी अवलोकिता, बुद्धरक्षिता व सौदामिनी झटलो, व त्याप्रमाणें तुझें कार्यही करून दिलें आतां आणखी तुझी काय इच्छा आहे?

**माधव**—भगवतीच्या प्रसादानें सर्व मनोरथ सफळ झालें ; आतां प्रीय होण्याचें काय उरलें आहे? तथापी आणखी प्रसादच करणें असेल तर आजपासून असें असो.

भुपाळी.

**घन कालीं ते वृष्टी करुनी देवो धान्याते ॥ भूपति तैसे नय अवलंबुनि पाळो अवनीते ॥ अघ सारें ते विलया जाउनि संपत् संतातिते ॥ जन हे पावुनि सुखि राहोकीं सेवुनि संताते ॥ १ ॥**

(असे झाल्यावर सर्व जातान.)

पांचवा
अंक
समाप्त.

## पद.

सुखदाया ॥ जय शत्रुंजय गुरु दत्तात्रय अत्रली-
या ॥धृ०॥ सत्कुल जाता सुमनसनमिता मुनिवर
वनिता अनुसूया ॥ नंदन होउनि पावन अवनी
करिसी रक्षुनि धर्मा या ॥ तूं जगिं अवतरसी
लोका ताराया ॥ सुरराया ॥ १ ॥ या संसारी
मायागारीं दुःखें भारी भोगुनिया ॥ शिणलों देवा
लौकरि धावा निजपद दावा दासा या ॥ मी
काळचि सारा घालविला वाया ॥ मोहुनिया ॥ २ ॥
मृणालमालासम ही विमला कविता तुजला अ-
र्पुनिया ॥ करितो विनती हरुनी दुर्मति द्या मज
सन्मति गुरुवर्या ॥ या गजाननाची इच्छा पुरवा-
या ॥ धावुनि या ॥ ३ ॥

संगीत मालतीमाधव नाटक समाप्त.